रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २६०
www.ramprahar.com
◆ गुरुवार, ९ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
मोबाईलवरून महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल/२
ग्रामीण भागात आजही वाळवण पद्धती टिकून/५
कपिल देवच्या गोलंदाजीवर चंदू बोर्डेची फलंदाजी/८

## रायगडातील खाण मालकांना उत्खननाची परवानगी



**मुंबई :** आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या खाणींना सरसकट बंदी न घालता उत्खननासाठी परवानगी द्यावी, मात्र कोणत्याही परिस्थितीत अवैध उत्खनन होणार नाही याची काटेकोर खबरदारी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि.८) येथे दिले. रायगड जिल्ह्यातील गौण खनिज उत्खनन अंतर्गत श्रीवर्धन मतदारसंघातील दगडखाणींसंदर्भात महसूलमंत्री दालनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. उत्खननाला परवानगी देतानाच महसूलमंत्र्यांनी प्रशासनाला अवैध प्रकारांबाबत सतर्क राहण्याचा सूचित केले आहे. या बैठकीला राज्याच्या महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे, रायगडचे जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

# मच्छीमार बांधवांना पाठबळ देणार

### मंत्री नितेश राणे यांची ग्वाही; विविध कामांचे भूमिपूजन



**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणाला ७२० किमीची किनारपट्टी लाभली आहे. मच्छीमार बांधवांसाठी महाराष्ट्र सरकार विविधा योजना राबवत असून मासेमारीला कृषी दर्जा देण्यात आला आहे. कोकण किनापट्टीवर राहणाऱ्या मच्छीमारांना आर्थिक सक्षम करण्याचे आमचे प्रयत्न आहेत, अशी ग्वाही मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी दिली.

अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायत हद्दीतील साखर येथे ग्रोयान्स बंधारा, जेट्टी बांधणे व नौकानयन मार्गातील गाळ काढणे या कामांचे भूमिपूजन बुधवारी (दि. ८) मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. येथील या ग्रोयान्स बंधारा व जेट्टीचे काम दर्जेदार असेल. हे काम दिलेल्या दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण करणार, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या कार्यक्रमाला आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, जि.प.चे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील, अलिबाग पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील, माजी जि.प. सदस्य द्वारकानाथ नाईक, पंचायत समिती सदस्य प्रियदर्शनी पाटील, आक्षी ग्रामपंचायतीच्या सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, वेस्ट कोस्ट परसेसीन नेट वेल्फर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. कैलास चौलकर, नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर, अमीर ठाकूर आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री नितेश राणे म्हणाले की, राज्यात मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना राबवली जात आहे. त्याचा लाभ मच्छीमारांना होणार आहे. संपूर्ण कोकण किनापट्टीचा विकास केला जाणार आहे. किनारपट्टीवरील मच्छीमारांची घरे नियमित केली जातील. किनारपट्टीवर जी विकासकामे केली जातील त्याचा लाभ स्थानिकांना मिळेल याची दक्षता घेतली जाईल. हे करत असताना कुणी परप्रांतीयांनी समुद्रकिनाऱ्यावर अतिक्रमण केले असेल, तर ते हटविण्यात येईल.

आक्षी येथील ग्रोयान्स बंधारा, जेट्टी व इतर कामांसाठी मी प्रयत्न केले. त्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या मिळत नव्हत्या. त्या परवानग्या मिळवून देण्याचे काम मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे यांनी केले. दोन्ही बाजूंच्या बंधाऱ्यांना विशेष बाब म्हणून परवानगी दिली. माझ्या मतदारसंघातील कामांसाठी ते मदत करत असतात, असे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.

आक्षी ग्रामपंचायतीचे उपसरपंच आनंद बुरांडे, वेस्ट कोस्ट परसेसीन नेट वेल्फर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. कैलास चौलकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यकारी अभियंता मनिष मेतकर यांनी प्रास्ताविक, तर प्रतिम सुतार यांनी सूत्रसंचालन केले.

# अमेरिका-इराणमध्ये युद्धविराम!

### दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधीवर उभय देशांचे एकमत





**न्यूयॉर्क, तेहराण : वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष अखेर थांबला आहे. दोन्ही देशांनी दोन आठवड्यांसाठी शस्त्रसंधी प्रस्ताव मान्य केलो. त्यामुळे ३९ दिवसांपासून सुरू असलेल्या या युद्धापासून आता जगाला दिलासा मिळणार आहे. शस्त्रसंधीच्या कालावधीत होर्मुझ सामुद्रधुनी खुली असणार आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतील जहाजांची वाहतूक इराणने रोखली होती. होर्मुझ सामुद्रधुनी खुली न केल्यास इराणमधील ऊर्जेशी संबंधित पायाभूत सुविधा तसेच इराणची संपूर्ण सभ्यताच नष्ट करण्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यासाठी इराणला मुदत देण्यात आली होती. मुदतीचा कालावधी संपण्याच्या दीड तास आधी ट्रम्प यांनी सोशल मीडियावरून इराणबरोबर शस्त्रसंधी प्रस्ताव झाल्याची घोषणा केली. हा शस्त्रसंधी करार फक्त दोन आठवड्यांसाठी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर ४० मिनिटांनी इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी ट्रम्प यांच्या पोस्टला दुजोरा दिला.

इराणचे परराष्ट्रमंत्री अराघची यांनी शस्त्रसंधी झाल्यानंतर एक पोस्ट शेअर केली. त्यात त्यांनी इराणने अमेरिकेसमोर १० कलमी कार्यक्रम ठेवल्याचे नमूद केले तसेच इराणने केलेल्या मागण्यांचा प्रस्ताव अमेरिकेने मान्य केल्यामुळे इराण होर्मुझ सामुद्रधुनी खुली करत आहे, असेही म्हटले आहे.

### भारताकडून भूमिकेचे स्वागत

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण या दोन देशांमध्ये युद्धविरामावर एकमत झाले असून भारताने याचे स्वागत केले आहे. या युद्धविरामामुळे पश्चिम आशियामध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी आशाही भारताने व्यक्त केली आहे. याबाबत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून अधिकृत निवेदन जारी करण्यात आले आहे. यामध्ये भारताने सातत्याने तणाव कमी करण्याच्या बाजूने भूमिका मांडली आहे तसेच सुरू असलेला संघर्ष लवकरात लवकर संपवण्यासाठी संवाद आणि डिप्लोमसी हे गरजेचे आहे, यावरही भारताने भर दिल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे.

## आक्षीचे उपसरपंच सहकाऱ्यांसह भाजपमध्ये दाखल



**अलिबाग :** आक्षी ग्रामपंचायतीचे उपसरंपच आनंद बुरांडे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह बुधवारी (दि. ८) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी त्यांचे भाजपमध्ये स्वागत केले.

आक्षी क्षेत्रातील साखर येथे ग्रोयान्स बंधारा, जेट्टी बांधणे व नौकानयन मार्गातील गाळ काढणे या कामाचे भूमिपूजन मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर आयोजित पक्षप्रवेश समारंभात मंत्री राणे यांच्या उपस्थितीत बुरांडे व सहकाऱ्यांनी 'कमळ' हाती घेतले.

कार्यक्रमास जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, जि.प.चे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील, पं.स. सदस्य प्रियदर्शनी पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी आनंद बुरांडे, ग्रामपंचायत सदस्य विनायक पाटील, साखर कोळीवाडा अध्यक्ष श्याम गण, उपाध्यक्ष जनार्दन नाखवा, पांडुरंग नाखवा, नागेश पेरेकर यांच्यासह ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

## एमपीएससी राज्य सेवा परीक्षेचा निकाल जाहीर

**नागपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) २७ ते २९ मे २०२५ या कालावधीत घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०२४चा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. त्यानुसार विविध २० संवर्गातील एकूण ४६१ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे.

या परीक्षेमध्ये सोलापूर जिल्ह्यातील विजय नागनाथ लामकाने हे सर्वसाधारण तथा मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम, तर सोलापूर जिल्ह्यातील आरती परमेश्वर जाधव या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत.

उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गासाठी शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन गुण) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत, तर वैद्यकीय तपासणीस अनुपस्थित असलेले वैद्यकीय तपासणी पूर्ण न केलेल्या उमेदवारांचा अंतिम निकालात समावेश करण्यात आलेला नाही

## नवी मुंबई महापालिकेचा ६९०४.४३ कोटींचा अर्थसंकल्प

### मध्यरात्री अडीच वाजता मंजूर



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेचा सन २०२५-२६चा सुधारित आणि २०२६-२७चा मूळ अर्थसंकल्प महापौर सुजाता पाटील यांनी अंतिम स्वीकृतीसाठी सभेसमोर ठेवला, जो सर्वानुमते मध्यरात्री अडीच वाजता मंजूर करण्यात आला.

या विशेष सभेस व्यासपीठावर उपमहापौर दशरथ भगत आणि आयुक्त डॉ.कैलास शिंदे उपस्थित होते. स्थायी समिती सभापती अशोक पाटील यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सभागृह नेते सागर नाईक, विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांच्यासह एकूण ८६ सदस्यांनी आपली मते मांडली.

यानंतर स्थायी समितीने सादर केलेले सन २०२५-२६चे सुधारित ५८३०.८२ कोटींचा अर्थसंकल्पीय अंदाज व २०२६-२७चा मूळ ६७०४.४३ कोटींचा अर्थसंकल्पीय अंदाज यावर सर्व सदस्यांनी सूचित केलेल्या सूचनांचा विचार करून महापौर पाटील यांनी २०२५-२६च्या सुधारित खर्चात केलेल्या फेरफार व आरंभीच्या शिलकीत २०० कोटी वाढ अपेक्षित धरण्यात आली असल्याचे सूचित केले.

यानुसार सन २०२६-२७च्या मूळ जमेच्या अंदाज आरंभीच्या शिलकीसह एकूण ६९०४.४३ कोटी व खर्चामध्ये २०० कोटींची वाढ करून एकूण खर्च ६८८९.४३ कोटी आणि अखेरची शिल्लक १५ कोटी राहील असा अंदाज आहे.

> *कोणतीही करवाढ न करता योग्य नियोजनाद्वारे शहराचा सर्वांगीण विकास घडविण्यावर भर देणारा आणि लोकाभिमुख दर्जेदार सुविधापूर्ती करणारा नवी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांचा आर्थिक दस्तऐवज नाही, तर नवी मुंबईच्या प्रगतीचा ठाम संकल्प आहे.*
>
> **-सुजाता पाटील,** महापौर

## निवडक

### खेळाडूंच्या प्रवेशावर निर्बंध

**मुंबई :** आयपीएल हंगाम सुरू होण्यापूर्वीच बीसीसीआयने सरावासंबंधित नियमांसह काही नियमांमध्ये बदल केले होते. आता सामन्यांदरम्यान प्लेईंग इलेव्हनमध्ये निवड न झालेल्या खेळाडूंसाठी मार्गदर्शक तत्त्व जारी करण्यात आली आहेत. राखीव खेळाडूंना आता सामन्यांदरम्यान मैदानावर फिरता येणार नाही. केवळ सामन्यासाठी नियुक्त केलेल्या १६ खेळाडूंनाच अत्यावश्यक कामांसाठी जसे की ड्रिंक्स देणे किंवा कोचचा मेसेज पोहचवणे यासाठी मैदानावर जाण्याची परवानगी असेल. अन्यथा कारवाई केली जाऊ शकते.

### इस्रायलचे लेबनॉनवर हवाई हल्ले

**बैरूत :** इस्रायलने बुधवारी लेबनॉनमध्ये विविध ठिकाणी भीषण हल्ले केले. या हवाई हल्ल्यांमध्ये ८९ नागरिक ठार झाले असून ७०० लोक जखमी झाले आहेत. दक्षिण लेबनॉनमध्ये मृत झालेल्यांमध्ये १२ वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा समावेश, अशी माहिती लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाच्या एका प्रवक्त्याने रॉयटर्सला दिली आहे.

## भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंतूनिर्मूलन मोहिमेचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंतूनिर्मूलन मोहिमेचा शुभारंभ बुधवारी (दि.८) आकुर्ली येथे झाला. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन पार पडले.

रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्राची जाधव, आत्माराम भस्मा, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

वाढत्या भटक्या श्वानांच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती पनवेल, ग्रामपंचायत आकुर्ली आणि युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांच्या माध्यमातून हे अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेमुळे परिसरात रेबीजसारख्या आजारांना आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.




## सोनू निगम यांनी जाणून घेतले शेतीचे तंत्र



**कर्जत : प्रतिनिधी**

लोकप्रिय आणि अष्टपैलू पार्श्वगायक, संगीतकार, अभिनेते, पद्मश्री सोनू निगम यांनी बुधवारी (दि.८) कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राला भेट दिली आणि शेतीचे तंत्र जाणून घेतले.

सोनू निगम यांच्यासोबत सुविद्य पत्नी फॅशन डिझायनर, उद्योजिका, क्लासिकल डान्सर मधुरीमा निगम, मुलगा निवान तसेच जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे उपस्थित होते.

यावेळी कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने यांनी सोनू निगम यांना डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित व शिफारस केलेल्या भाताच्या विविध सुधारित, संकरित जातींची गुणवैशिष्ट्ये सांगितली तसेच विविध फळपिके, मसाला पिके, कृषी यंत्रे आणि सुधारित अवजारांची इत्यंभूत माहिती दिली.

शेतकऱ्यांचे भात शेतीतील कष्ट कमी करणारे सुधारित ड्रम सिडर व मनुष्यचलित लावणी यंत्र, ते वापरण्याची पद्धत ऐकून सोनू निगम हरखून गेले. विशेष म्हणजे किफायतशीर शेतीचे तंत्र जाणून घेण्यात निगम कुटुंबियांनी खूप रस दाखविला. येत्या हंगामात कर्जत परिसरातील त्यांच्या फार्महाऊसमध्ये कोकण कृषी विद्यापीठाचे वाण नक्की घेऊ, असे सांगून पुन्हा येण्याबद्दल त्यांनी आश्वस्त केले.

यानिमित्ताने डॉ.मर्दाने यांनी निगम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि काळीमिरीची कलमे भेट दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सोनू जगताप व मंदार म्हसे हेही उपस्थित होते.

## मित्रांनी बर्थडे पार्टीला न बोलावल्याने तरुणाची आत्महत्या

**बीड : प्रतिनिधी**

मित्रांसोबत झालेल्या वादानंतर वाढदिवसाच्या पार्टीला न बोलावल्यामुळे एकट्या पडलेल्या एका तरुणाने विष प्राशन करून जीवन संपवले. ही धक्कादायक घटना अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथे घडली आहे. महेश उद्‌भव (वय २४) असे आयुष्य संपवलेल्या तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार महेशचे त्याच्या मित्रांसोबत काही दिवसांपूर्वी वाद झाले होते. सोमवारी ६ एप्रिलला एका मित्राचा वाढदिवस होता. नेहमी मित्रांच्या कामात आणि वाढदिवसाच्या नियोजनात पुढाकार घेणाऱ्या महेशला यावेळी मित्रांनी बोलावले नाही. त्याला सोडून सर्वांनी वाढदिवस साजरा केला. यामुळे तो प्रचंड मानसिक दडपणाखाली होता. अशातच त्याने मंगळवारी दुपारी आत्महत्या केली. उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

आत्महत्येपूर्वी मंगळवारी दुपारी महेशने आपल्या मोबाईलवर "माझं दुःख कोणाला सांगू, मी एकटा पडलो", असे भावनिक स्टेटस ठेवले होते. त्याच्या अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# 'प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी उपयुक्त'

**मुंबई : प्रतिनिधी**

विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अंमलबजावणीदरम्यान बँडविड्थची कमतरता ही मोठी अडचण ठरत होती. विशेषतः शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केल्यावर अचानक वाढणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकमुळे प्रणाली कोलमडण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता असायची. अशा परिस्थितीत डेटा सेंटरमधील प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि तत्काळ बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस हस्ते वर्षा निवासस्थानी इक्विनिक्स (Equinix) कंपनीच्या एमबी ३ डेटा सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे तसेच एपीएसी (APAC) चे अध्यक्ष सायरस अडग्रा, इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज पॉल, व्ही.पी. ग्रोथ अँड इमर्जिंग मार्केटचे मॅक्स पॅरी, आयबीएक्सचे वरिष्ठ संचालक गणेश पवार, पब्लिक पॉलिसी अँड गव्हर्नन्सच्या संचालक एलिजाबेथ हर्नांडेझ उपस्थित होते.



इक्विनिक्स एमबी ३ डेटा सेंटर इक्विनिक्स ही जगातील सर्वात मोठी डेटा सेंटर आणि इंटरकनेक्शन सेवा देणारी कंपनी असून, ३६ देशांतील ७७ महानगरांमध्ये २८० डेटा सेंटर्सचे जाळे कंपनीकडे आहे. भारतातील इक्विनिक्सचे पूर्णतः स्वतःच्या मालकीचे आणि नव्याने उभारलेले एमबी ३ हे पहिले डेटा सेंटर आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३.७ एकर जागेवर उभारणी करण्यात आली असून, एकूण गुंतवणूक सुमारे ७५० दशलक्ष अमेरिकन डॉलर (सुमारे ६,००० कोटी रुपये) इतकी आहे. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर येथे ४,२०० हून अधिक कॅबिनेट्सची क्षमता उपलब्ध होणार आहे. एमबी ३ डेटा सेंटर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित सेवांसाठी सक्षम आहे. तसेच, हायब्रिड मल्टी-क्लाउड इंटरकनेक्शन सुविधेद्वारे जगभरातील इक्विनिक्सच्या डेटा सेंटर्सशी तसेच ११ हजाराहून अधिक ग्राहकांशी जोडणी शक्य होणार आहे.

ऊर्जा शाश्वततेच्या दृष्टीने यवतमाळ येथे उभारण्यात आलेल्या २६.६ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून या डेटा सेंटरसाठी आवश्यक ऊर्जेचा मोठा भाग उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या मुंबईतील इक्विनिक्स डेटा सेंटर्समध्ये वापरल्या जाणाऱ्या उर्जेपैकी सुमारे ६० टक्के ऊर्जा या सौर प्रकल्पातून मिळते.

# मोबाईलवरून विनयभंग; गुन्हा दाखल

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूरातील एका महिलेला मोबाईलवरून वारंवार संपर्क साधत व्हिडीओ कॉलद्वारे अश्लील कृत्य करून विनयभंगकेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या बाबत आरोपी विरुद्ध खालापूर पोलीसांत गुन्हा दाखल केला आहे.




६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.३० या कालावधीत मौजे खालापूर येथील . दळवी यांच्या कार्यालय परिसरात तसेच पहल नर्सिंग लाईव्हस समोरील रस्त्यावर हा प्रकार घडला. आरोपी (रा.सुधागड, ता. पाली) याने महिला फिर्यादी (रा. निंबोडे, ता. खालापूर) हिच्याशी जवळीक निर्माण करण्याच्या उद्देशाने वेळोवेळी मोबाईलवर संपर्क साधला.नंतर आरोपीने व्हिडीओ कॉल करून अश्लील कृत्य करत फिर्यादीचा विनयभंग केला. या प्रकारामुळे फिर्यादीला मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत कलम ६७, कलम ७८(२) व ७९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार करीत आहेत

# 'महाराजस्व अभियानाचा फायदा घ्यावा'

**चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिप्रेत असलेल्या शेतकरी आणि सर्व सामान्य जनतेच्या हिताच्या योजना याची त्वरीत अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान चौक येथील प्रबोधनकार ठाकरे सभागृहात शुक्रवारी १० एप्रिल रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजे पर्यंत आयोजित केले असून जनतेने याचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहन खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी केले आहे.

समाधान शिबिरात वर्ग दोन च्या जमिनी वर्ग एक करणे, ७/१२ दुरुस्ती व वाटप,फेरफार नोंद, फेरफार ७/१२ वाटप, चूक दुरुस्ती, वारस नोंद, आभा कार्ड,जन्म,मृत्यू नोंद, शैक्षणिक दाखले,जातीचे दाखले,याबाबत माहिती दिली जाणार आहे.

# महावितरणचा पावसाळी कामांसाठी वीज प्रवाह बंद ठेवण्याचा निर्णय

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात ३२ हजारपेक्षा जास्त वीज उपभोक्ते ग्राहक आहेत. लवकरच पावसाला सुरू होणार असल्याने पावसाळ्यापूर्वीची कामे पूर्ण करण्याकडे वीज महावितरणचे लक्ष असून ती कामे पूर्ण करण्याकडे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.पावसाळी हंगामात कोणताही अडसर अथवा समस्या उद्भवू नये यासाठी मेंटेनन्स कामे पूर्ण करण्याकडे जास्त लक्ष देण्यात येत आहे.

मुरुड तालुक्यातील सर्व गावातील व मुरुड शहरातील रहिवाश्यांना सुचित करण्यात येते खालील प्रमाणे मुरुड उपविभागामध्ये वीज पुरवठा पावसाळी पूर्व कामाकरिता बंद ठेवण्यात येणार असल्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दिनांक : ०९/०४/२६ | वेळ : सकाळी ०६:३० ते दुपारी १२:०० पर्यंत

दिनांक : ११/०४/२६ | वेळ : सकाळी ०६:३० ते दुपारी १२:०० पर्यंत

दिनांक : १३/०४/२६ | वेळ : सकाळी ०६:३० ते दुपारी १२:०० पर्यंत

दिनांक : १५/०४/२६ | वेळ : सकाळी ०६:३० ते दुपारी १२:०० पर्यंत वीज प्रवाह बंद ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

या बाबत असंख्य लोकांनी एप्रिल महिन्यात कामे पूर्ण केल्यानंतर मे महिन्यात ट्री कटिंग च्या नावाखाली वीज बंद करण्यात येऊ नये अशी मागणीही केली आहे.तसेच जी वेळ दिली आहे.ती अचूक पाळण्यात यावी कारण सध्या तापमान खूपच वाढल्याने लोकांना घामाच्या धारा वाहत आहेत

# बाजारात हापूसची मोठी 'लूट'; आवक वाढली तरी दर मात्र स्थिर!

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या नवी मुंबईतील वाशी एपीएमसी (APMC) फळ बाजारात सध्या कोकणातील हापूस आंब्याची आवक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तानंतर कोकणातून हापूसच्या पेट्या दाखल होण्याचे प्रमाण वाढल्याने बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, आवक वाढूनही आंब्याचे दर मात्र स्थिर असल्याने ग्राहकांना दिलासा मिळत आहे.



गुढीपाडव्याच्या सणानंतर बागांमधून मोठ्या प्रमाणात आंबा उतरवण्यात आल्यामुळे बाजारात पुरवठा वाढला होता. सुरुवातीच्या काळात दरात किरकोळ घसरण झाली असली, तरी सध्या मागणी आणि पुरवठा यांचा योग्य समतोल साधला गेला आहे.

व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्राहकांकडून हापूसला मोठी मागणी असल्याने मोठ्या प्रमाणात आवक होऊनही दर खाली आलेले नाहीत. सध्या बाजारातील परिस्थिती स्थिर असून दरांमध्ये कोणताही मोठा चढ-उतार पाहायला मिळत नाहीये.

**कोकणच्या हापूसचा बाजारात दबदबा**

रत्नागिरी, देवगड आणि रायगड या पट्ट्यातून दररोज हजारो पेट्यांची आवक वाशी बाजारात होत आहे. यावर्षी आंब्याचा दर्जा चांगला असल्याने आणि फळ लांबट व रसाळ असल्याने खवय्यांची पहिली पसंती कोकणच्या हापूसला मिळत आहे. दर्जेदार हापूस आंबे स्थिर दरात मिळत असल्याने किरकोळ विक्रेते आणि सामान्य ग्राहक दोघांकडूनही खरेदीचा उत्साह दिसून येत आहे.

बाजारातील जाणकारांच्या मते, मे महिना हा आंब्याचा मुख्य हंगाम असतो. सध्या सुरू असलेली आवक पाहता, पुढील किमान महिनाभर तरी दर याच स्तरावर राहण्याची शक्यता आहे. "आवक वाढली असली तरी मागणीही तितकीच जोरदार आहे, त्यामुळे दर कोसळण्याची शक्यता सध्या तरी वाटत नाही," असे एका व्यापाऱ्याने सांगितले.

आगामी काळात उन्हाचा तडाखा वाढणार असल्याने आंब्याची गोडी अजून वाढणार आहे. स्थिर दरांमुळे सर्वसामान्यांनाही आता 'हापूस'चा आस्वाद घेणे सहज शक्य झाले आहे. एकूणच, एपीएमसी बाजारात सध्या 'फळांचा राजा' भाव खाऊन जात असून हंगाम अधिक रंगतदार वळणावर पोहोचला आहे.

# पीएनजी पाईपलाईन कनेक्शन घेण्याचे पनवेल पालिकेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाने देशभरात नैसर्गिक गॅस पुरवठा वाढविण्यावर भर दिला आहे. केंद्र शासनानच्या सूचनेनूसार एलपीजीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीने ज्या भागात नैसर्गिक गॅस पाईपलाईन उपलब्ध आहे, तेथे एलपीजी ऐवजी पीएनजी (पाईपद्वारे नैसर्गिक वायू) वापरास प्रोत्सहन देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी नागरिकांनी पीएनजी गॅस पाईपलाईन कनेक्शन घेण्याचे आवाहन केले आहे.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नियोजनबद्ध धोरणांमुळे व पायाभूत सुविधांच्या सक्षम उभारणीमुळे शहरात नैसर्गिक वायू वितरण व्यवस्थेला गती मिळाली असून, महानगर गॅस लिमिटेड (MGL) कडून अखंड PNG (पाईपद्वारे नैसर्गिक वायू) व CNG (संकुचित नैसर्गिक वायू) पुरवठ्याची हमी देण्यात आली आहे. याबाबत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील गृहनिर्माण सोसायटींच्या अध्यक्ष व सचिव यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच महापालिकेच्यामार्फत प्रभाग निहाय पीएनजी पाईपलाईन नोंदणी कॅम्प लावण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या ९ मार्च २०२६ रोजीच्या नैसर्गिक वायू (पुरवठा नियमन) आदेश, २०२६ नुसार घरगुती PNG व CNG यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. महानगर गॅस लिमिटेडकडून सातत्याने पुरवठा कायम राखण्यासाठी कायम राखण्यासाठी उपाययोजना राबविल्या आहेत. ज्यामुळे ग्राहकांना दैनंदिन वापरासाठी विश्वसनीय आणि सुरक्षित इंधन मिळणार आहे. या निर्णयाचा थेट लाभ पनवेल शहरातील नागरिकांना मिळणार आहे. पनवेल महानगरपालिकेने शहरातील आवश्यक परवानग्या, समन्वय व पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे हा उपक्रम प्रभावीपणे राबविणे शक्य झाले आहे.

ग्राहकांसाठी विशेष लाभ योजना MGL मार्फत ग्राहक-केंद्रित विविध योजना राबविण्यात येत असून, त्याचा लाभ पनवेलमधील नागरिकांना मिळणार आहे. घरगुती ग्राहकांसाठी आकर्षक योजना



१.१६ मार्च ते ३० एप्रिल २०२६ दरम्यान नवीन नोंदणी करणाऱ्यांना ₹५०० किमतीचा मोफत गॅस
२.नोंदणीवेळी कोणतेही आगाऊ शुल्क नाही
३.मीटर बसविल्यानंतर पहिल्या बिलात शुल्क आकारणी
४.हप्त्यांमध्ये पेमेंट करण्याची सुविधा

**व्यावसायिक ग्राहकांसाठी आकर्षक योजना**

१.नोंदणी शुल्क पूर्णतः माफ
२.आवश्यक पायाभूत सुविधा कंपनीकडून उभारली जाणार
३.पनवेल महानगरपालिका नागरिकांना आवाहन करते की, पर्यावरणपूरक व सुरक्षित इंधन म्हणून PNG चा जास्तीत जास्त वापर करावा व या योजनांचा लाभ घ्यावा.

**फसवणूक टाळण्यासाठी सूचना**

-अज्ञात लिंकवर क्लिक करू नये
-APK फाईल डाउनलोड करू नये
-OTP किंवा बँक संबंधित माहिती कोणाशीही शेअर करू नये
-केवळ MGL च्या अधिकृत WhatsApp क्रमांकावरच (निळा टिक चिन्हासह) विश्वास ठेवावा.

**नोंदणीसाठी लागणारी कागदपत्रे**

१) रहिवासी पुरावा (कोणताही एक)
२) वीज बिल
३) इंडेक्स २ ची प्रत
४) पासपोर्ट
५) ओळखपत्र (कोणताही एक) आधार कार्ड / पॅन कार्ड / मतदार ओळखपत्र / वाहन चालविण्याचा परवाना
६) ईमेल आयडी
७) पर्यायी मोबाईल नंबर

तसेच आपल्या सोसायटीसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि सोयीस्कर गॅस पाईप लाईन सुविधा मिळवण्यासाठी व सोसायटीमध्ये कॅम्प लावण्यासाठी या अधिकृत प्रतिनीधींशी संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेने केले आहे.

**महानगर गॅसचे संपर्कासाठीचे अधिकृत प्रतिनिधी**

**प्रभाग अ : खारघर शहर**
१.विनायक म्हमाणे ९९६७५४४३८७
२.महेश थोरात ९५९४३९११८९
३.रवी सोनावणे ८४५१०८९७७७
४.सचिन गोरे ९०२९८२१७१३
५.मोहमद अकील - ७६७८०७६३७०

**प्रभाग ब : कळंबोली शहर**
१.ऋषिकेश भोईर ७७१८०७८५३३

**प्रभाग क : कामोठे शहर**
१.संतोष जाधव ८८२८९८९९७२
२.राज ८६००५२०७२८

**प्रभाग ड : पनवेल / कारंजाडे शहर**

**पनवेल शहर**
१.अमित पवार ९८६७८१४२४९
२.सुरज म्हात्रे ७०२१९३३०१४

**नवीन पनवेल शहर**
१.राजरत्न भोसले ९७०२८८०७४३

**खांदा कॉलनी**
१.प्रदीप शेंडकर ९६९९९१४१४९

**कारंजाडे शहर**
१.आकाश देशमुख ७५०६४६२८४७
२.सुरज म्हात्रे ७०२१९३३०१४

# अष्टमी कोळीवाडा येथे सातआसरा आणि शितळादेवी तारु उत्सव

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरातील अष्टमी कोळीवाडा येथील श्री सातआसरा व शितळादेवी त्रैवार्षिक तारु उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सायंकाळी काढण्यात आलेल्या पालखी उत्सवामध्ये कोळी बांधवसह अष्टमीकर पारंपारिक वेशभूषा परिधान करून सामील झाले होते. वाद्यवृंदावर कोळी बांधवांनी ठेका घेतला होता. सायंकाळी काढण्यात आलेल्या पालखी उत्सवात कोळी बांधव सहभागी होत मातेचे दर्शन घेतले संपूर्ण वातावरण यावेळी उत्सव भक्तीमय झाल्याचे दिसून आले.

दिवसभर झालेल्या विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमध्य देवीचा अभिषेक, सवासिन पूजन व देवीची ओटी भरण्याचा कार्यक्रम, महाप्रसाद, देवींच्या तारूची भव्य मिरवणूक व विसर्जन आदीसह विविध धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रम झाले हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दर्या किनारा मित्र मंडळ, ग्रामस्थ मंडळ, व महिला मंडळ अष्टमी कोळीवाडा यांनी परिश्रम घेतले.



# नवी मुंबईत जनगणनाविषयक तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

भारत सरकारने २०२७ मध्ये लोकसंख्या जनगणना कार्यक्रम जाहीर केला आहे. जनगणना कार्यक्रमाचा अंतीम कालावधी दि. १ मार्च २०२७ रोजी ००:०० वा. आहे. भारत देशामध्ये दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. यावर्षी भारताची पहिली डिजिटल जनगणना होत आहे.

जनगणना २०२७ ही स्वतंत्र दोन टप्प्यातील असून घर यादी व घरगणना हा पहिला टप्पा दि. १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पाडेल व दुसरा टप्पा फेब्रुवारी /मार्च २०२७ मध्ये पार पडेल. प्रत्यक्ष क्षेत्र कार्यास प्रारंभ होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर म्हणजेच दि. १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वगणनेचा पर्याय उपलब्ध असेल. स्वगणना हा एक नाविन्यपूर्ण व सोयीस्कर पर्याय आहे व त्यामध्ये आपल्या सोयीनुसार सुरक्षित वेब पोर्टल वापरून आपल्या कुंटुंबाची माहिती स्वतःहून ऑनलाईन भरण्याची मुभा उपलब्ध आहे.



त्या अनुषंगाने जनगणना कार्य निदेशालय, महाराष्ट्र यांचेकडील नियुक्त मास्टर ट्रेनर श्रीम.तेजल कटारे, सहा. संचालक जनगणना तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडील नियुक्त मास्टर ट्रेनर, उप अभियंता श्री. स्वप्नील देसाई यांचेमार्फत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ८ विभाग कार्यालयातील नियुक्त केलेल्या४५ फिल्ड ट्रेनर, यांचे प्रात्याक्षिकांसह प्रशिक्षण दि. ६ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२६ या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिका (मुख्यालय) येथे आयोजित करण्यात आले होते.

याकरिता बेलापूर येथील सेक्टर ८ मध्ये सर्व फिल्ड ट्रेनर यांना स्वतः प्रगणक बनवून तसेच नवी मुंबई क्षेत्रामध्ये अंदाजे ५०० पर्यवेक्षक व ३१०० प्रगणक यांना त्या विभाग क्षेत्रातील फिल्ड ट्रेनर हे दि. २६ एप्रिल २०२६ ते दि. ८ मे २०२६ या कालावधीमध्ये प्रशिक्षण देणार आहेत. त्यानंतर प्रगणक व पर्यवेक्षक हे त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्रातील प्रत्येक गटातील घरगणना आकडेवारी दि. १६ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीमध्ये प्रत्यक्ष घरोघरी जाऊन प्राप्त करून घेणार आहेत.

सदर प्रशिक्षणामध्ये महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे, परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, अतिक्रमण उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, मालमत्ता कर विभागाचे उप आयुक्त डॉ.अमोल पालवे तसेच उपआयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी संजय शिंदे यांनी सहभागी सर्व प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना प्रोत्साहीत करून मार्गदर्शन केले.

# नवीन कुकशेतच्या विठ्ठल-रखुमाई मंदिरात हरिनाम सप्ताह साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

मौजे नवीन कुकशेत गावं देवस्थान समितीच्या वतीने सलग ३६ व्या वर्षी आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ध्यानेश्वरी पारायण सोहळा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मोठ्या धार्मिक वातावरणात मंगळवारी संपन्न झाला.

नवी मुंबई महापौर सुजाता पाटील आणि नगरसेवक सुरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मागील तीन दिवस श्री विठ्ठल-रखुमाईचे नामस्मरण करीत सुरू असलेल्या पारायण सोहळ्यात ठाणे -बेलापूर पट्टीतील येथील हजारो महिला -पुरुष वारकरी सहभागी झाले होते.

## दुखवटा

### बाळू पार्टे



**उरण :** महाराष्ट्र पोलीस कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते बाळू कृष्णा पार्टे यांचे शनिवार दिनांक ४ रोजी वयाच्या ७५ वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांचा उत्तरक्रिया विधी बुधवार १५ रोजी सकाळी त्यांच्या राहत्या घरी बोरी, पानसरे आळी, उरण येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली ,बारा नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे.

# मुंबई-गोवा महामार्ग डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल

## मंत्री नितेश राणे यांचे प्रतिपादन; पत्रकारांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकार आणि राजकीय नेते हे जर एकत्र येऊन काम केले, तर कुठलाही विषय अशक्य राहणार नाही. आज आपल्या पत्रकारांकडून ज्या अपेक्षा आहेत, ज्या समस्या मांडल्या त्या सरकार दरबारात मांडून सोडविण्याचा प्रयत्न नक्कीच करणार. त्यातील विशेषतः मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग हा गेली पंधरा सोळा वर्ष रखडला आहे, पण आता डिसेंबर २०२६पर्यंत पूर्ण होतोय. तसेच मुरूड जंजिरा मुक्ती दिन हा ३१जानेवारी रोजी स्वतंत्र झाला त्याची आठवण म्हणून आता तो शासन स्तरावर साजरा होईल, अशी ग्वाही देतो, असे मत्स्य विकास मंत्री नितेश राणे यांनी पनवेल येथील आयोजित रायगड प्रेस क्लबच्या उपस्थित पत्रकार व कुटूंबीयांसमोर आपल्या भावना व्यक्त केल्या.

रायगड प्रेस क्लब या पत्रकारांच्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संघटनेचा २१ वा वर्धापन दिन सोहळा तसेच पनवेल महानगर प्रेस क्लबचा पहिला वर्धापनदिन सोहळा क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे झाला. या सोहळ्यात राज्यस्तरीय संपादक पुरस्कार आणि



जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार, व पनवेल महानगर प्रेस क्लबतर्फे विशेष सन्मान पुरस्कार हे मंत्री, आमदार महोदयांचे हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राज्याचे मत्स्य विकास मंत्री नितेश राणे, भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर, याशिवाय या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य विश्वस्त, मराठी पत्रकार परिषद एस.एम.देशमुख, महापौर नितीन पाटील, मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, मुंबई प्रेस क्लब अध्यक्ष राजा अदाटे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, कामगार नेते, व काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, नगरसेवक प्रथमेश सोमण, मराठी पत्रकार परिषद कोकण विभाग सचिव मनोज खांबे, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, पनवेल महानगर प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत शेडगे आदी व्यासपीठावार उपस्थित होते.

पत्रकारिता करताना आपण आपल्या समस्या बाजूला ठेवून समाजाचे विषय सोडविण्यासाठी आपण पुढाकार घेताय याबद्दल कौतुक करायला हवे. प्रेस क्लबसाठी नक्की मदत करेन, असे आवाहन भाजप गटनेते प्रवीण दरेकर यांनी यावेळी केले.

महापौर नितीन पाटील यांनी, रायगड प्रेस क्लब जिल्ह्यातील विविध सामाजिक प्रश्न सोडविले आहेत, असे सांगितले.

मुरूड जंजिरा संस्थानसुद्धा उशिरा स्वातंत्र्य झाला. तो दिवस ३१जानेवारी असून शासन स्तरावर हा दिवस मुरूड स्वतंत्र्य दिन साजरा व्हावा. या मागणीबरोबर पत्रकारावरील हल्ल्यांबाबत शासन स्तरावर प्रयत्न करावे, असे आवाहन एस.एम. देशमुख यांनी केले. इतर मान्यवरांनीही आपले विचार मांडले.

प्रास्ताविक रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे व कोकण विभाग सचिव मनोज खांबे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण मोहकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी पनवेल महानगर प्रेस क्लब उपाध्यक्ष तृप्ती पालकर, सचिव राकेश पितळे, खजिनदार सचिन भोळे, सहसचिव स्वप्नील दुधारे, सदस्य गणेश कोळी, संजय कदम, प्रतिक वेदपाठक, संदीप बोडके, सल्लागार सुमंत नलावडे, विजय पवार, अनिल भोळे यांनी मेहनत घेतली.

# पाणदिवे गावात डेंग्यूचे रुग्ण

## नागरिकांना खबरदारीचे आवाहन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पाणदिवे गावात डेंग्यूचे १५ आढळून आले आहेत. हे रुग्ण खाजगी व सरकारी रुग्णालयात उपचार करुन घेत असून त्या रुग्णाच्या तब्येतीत सुधारणा होत आहे.

दरम्यान, या आजारांचा अधिक प्रसार होऊ नये यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली वतीने यासंदर्भात उपाय योजना तसेच जनजागृती करण्यात येत आहे. तरी नागरिकांनी आप आपल्या घरात साठवून ठेवले पाणी झाकून ठेवावे तसेच आपल्या घर परिसरात डासांची उत्पत्ती वाढणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन डॉ. वंदनकुमार पाटील तालुका वैद्यकीय अधिकारी उरण यांनी केले आहे.

पावसाळा सुरू झाला की विविध आजारांचे रुग्ण आढळून येतात. यामध्ये सर्दी, खोकला, ताप डेंग्यू, मलेरिया आणि इतर



आजारांच्या रुग्णांचा समावेश असतो, मात्र सध्या उन्हाळ्याच्या दिवसात उद्भवणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नागरिक पाण्याची साठवणूक करतात. उरण तालुक्यातील काही गावांमधील नागरिक हे पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आप आपल्या घरात मोठ्या प्रमाणात पाण्याची साठवणूक करत असल्याचे दिसून येत आहे. पाणदिवे गावातील नागरिकांनी ही पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आप आपल्या घर परिसरात पाण्याची साठवणूक केल्याने उघड्या वर असणाऱ्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती झाल्याने आहे. सदर डास हे चावल्याने पाणदिवे गावात १५ डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहे. हे रुग्ण खाजगी व सरकारी रुग्णालयात उपचार करुन घेत असल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तीव्र डोकेदुखी, डोळ्यांमागे वेदना, स्नायू आणि सांधेदुखी, मळमळ, उलट्या, ग्रंथींना सूज, रॅशेस यांपैकी कोणतीही लक्षणं असतील नागरिकांनी घाबरून न जाता डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करून घ्यावे, असे आवाहन डॉ. वंदनकुमार पाटील तालुका वैद्यकीय अधिकारी उरण यांनी केले आहे.

# कॉपीराईटचा गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे सेक्टर ४ येथील मेडिकल आणि जनरल स्टोअरमध्ये एसएमसी गोरी (मेड इन पाकिस्तान) नावाचे कॉपीराईडचे हक्क आणि ट्रेडमार्क रजिस्ट्रेशन असलेले एसएमसी ब्युटी प्रॉडक्ट्स नावाचा वापर करून तयार केलेले तीन हजार १४६ किमतीचे बनावट ब्युटी क्रीम, डे नाईट ब्युटी क्रीम, सोप या साहित्याचे कॉपीराईट अधिकाऱ्यांचे उल्लंघन करून विक्रीसाठी बाळगल्याप्रकरणी गिरीश प्रकाश जैन (रा. निळकंठ गार्डन पनवेल) यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

करंजाडे येथे एसएमसी गोरी नावाचा बनावट ब्युटी क्रीम, डे नाईट ब्युटी क्रीम आणि साबण विक्री करत असल्याचे कॉपीराईट अधिकारी यांना माहिती मिळाली. त्यानुसार संकेश्वर मेडिकल आणि जनरल स्टोअर, येथे पोलिसांच्या उपस्थितीत छापा टाकण्यात आला. यावेळी दुकानातील रॅकवर असलेले साहित्य बाहेर काढण्यात आले. त्याची पाहणी केली असता ते बनावट असल्याचे दिसून आले. तसेच त्यावर मेड इन पाकिस्तान हा लोगो आहे. हा माल त्याने मुंबई येथून खरेदी केला असल्याचे सांगितले.

# उरण तालुक्यातील दोन धरणात ४७.६५ टक्के पाणीसाठा शिल्लक

**उरण : वार्ताहर**

उन्हाळ्याच्या एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला उरणला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा वेगाने खालावत चालला असून रानसई व पुनाडे या दोन धरणात मिळून सध्या ४७.६५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत हा पाणीसाठा जास्त असला तरी पुढचे दोन ते अडीच महिने तो पुरवावा लागणार आहे.उरण पंचायत समिती चा पाणीटंचाई निवारण कूती आराखडा तयार असून रानसई व चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील सहा वाड्यांवर पाणी टंचाईचे संकट ओढावले असल्याने



टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी लावून धरली आहे.

उरण तालुक्याच औद्योगिकीकरण आणि नागरिकरण झपाट्याने वाढत आहे.त्यामुळे उरणला पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई व पुनाडे या दोनही धरणातील पाणीसाठा ४७.६५ टक्क्यांवर आला आहे. या धरणातून दररोज ३८ दशलक्ष लीटर पाणी उरणकरांना दिले जाते. वातावरणातील उष्मा वाढू लागला असल्याने पाण्याचे बाष्पीभवन ही मोठ्या प्रमाणात होत असते.त्यामुळे रानसई धरणातील पाणीसाठा जुलै अखेर पर्यंत पुरेल असे नियोजन एम आय डी सी प्रशासनाला करावे लागणार आहे.तसेच पुनाडे धरणातील पाणीसाठ्याचे नियोजन हे लघुपाटबंधारे विभाग व पुनाडे आठ गाव पाणीपुरवठा कमिटीला करावे लागणार आहे.

उरण शहर व तालुक्यातील चाणजे सह इतर ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांना पाणी टंचाईचा सामना हा प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे दरवर्षी करावा लागत आहे. त्यात रानसई ग्रामपंचायत हद्दीतील खैरकाटी, बंगल्याची वाडी, सागाचीवाडी, मार्गाची वाडी व चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील केळाचामाळ, चाँदायणी वाडी येथील नागरिकांना दरवर्षी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

सध्या चिरनेर ग्रामपंचायतीने केळांचा माल व चाँदायणी वाडीवरील नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी केल्याचे रुपाली म्हात्रे उप अभियंता उरण पंचायत समिती - रायगड जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग यांच्या कडून सांगण्यात येत आहे.

## निवडक

### पैसे परत न दिल्याने हल्ला

**पनवेल :** पैसे परत न दिल्याने चाकूने वार केल्याची घटना तळोजा परिसरात घडली. या प्रकरणी नुमान अंसारी (राहणार दुर्वांकुर सोसायटी फेस टू तळोजा) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात ६ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मेहबूब शेख हा तळोजा घोट कॅम्प येथे राहत असून त्यांचा मित्र नुमान अन्सारी यांच्यात नेहमी पैशांची देवाण-घेवाण होत असते. दीड महिन्यापूर्वी नुमान कडून वीस हजार रुपये त्यांनी घेतलेले होते त्यातील ११ हजार रुपये देणे बाकी होते. ६ एप्रिल रोजी नुमानने त्याच्याकडे पैसे मागितले. यावेळी चार दिवस थांब, पैसे परत करतो असे बोलले. त्यावेळी त्यांच्यात वाद झाला आणि चाकूने डोक्यात वार केले. त्यात मेहबूब शेख हा जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### ट्रकची तरुणाला धडक

**पनवेल :** ट्रकने १६ वर्षीय तरुणाला धडक दिल्या प्रकरणी ट्रक चालका विरोधात सहा एप्रिल रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अवधूत कोल्हारेकर हा तळोजा, फेस वन येथे राहत असून तो रिक्षाने चित्रपट पाहायला खारघर येथे जात होता. रिक्षातून उतरून सिग्नल चालू असल्याने रस्त्याच्या साईडला धानसर टोल नाका ते नावडे हायवे रोडवर कडून ट्रॅफिक चौकीच्या समोर तो उभा होता. यावेळी ट्रक चालकाने समोरून ठोकर मारून अपघात केला. या अपघातामध्ये त्याच्या उजव्या पायाला गंभीर दुखापती झाल्या.

# घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** सेक्टर १४, नवीन पनवेल येथील घराचा दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी चार लाख ८५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात ७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गोविंदा पेरूमल सेक्टर १४, नवीन पनवेल येथे राहत असून त्यांना त्यांच्या घराच्या लोखंडी सेफ्टी डोरला लावलेले कुलूप दिसून आले नाही. त्यांनी दरवाजा उघडून पाहिले असता साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांनी पाहणी केली असता घरातील पैसे आणि सोन्याचे दागिने दिसून आले नाहीत. अज्ञात इसमाने सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा चार लाख ८५ हजारचा मुद्देमाल चोरून नेला.



**पनवेल : पंचायत समितीच्या नव्या सभापती रंजना वास्कर यांचे कुडावे गावातील विश्वनाथ मते यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, सदाशिव वास्कर आदी उपस्थित होते.**

# पत्रकार हरेश साठे यांना पुरस्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकारितेसोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या रायगड प्रेस क्लब या संघटनेचा २१वा वर्धापन दिन तसेच पनवेल महानगर प्रेस क्लबचा प्रथम वर्धापन दिन निमित्त पत्रकारिता, सामाजिकसेवा विशेष सन्मान सोहळा बुधवारी (दि. ८) पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी राज्याचे मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते पनवेल येथील पत्रकार हरेश साठे यांचा रायगड जिल्हा श्रमिक पत्रकारिता सन्मान पुरस्काराने गौरव करण्यात आला. मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त व रायगड प्रेस क्लबचे संस्थापक एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, झी २४ तास वृत्तवाहिनीचे संपादक कमलेश सुतार, मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, नगरसेवक प्रथमेश सोमण, मराठी पत्रकार परिषद कोकण विभाग सचिव मनोज खांबे, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांच्यासह रायगड प्रेस क्लब तसेच पनवेल महानगर प्रेस क्लबचे पदाधिकारी आणि शेकडो पत्रकार, विविध संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेतर्फे जनगणना फील्ड ट्रेनर प्रशिक्षण






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासन निर्देशानुसार पनवेल महापालिकेच्या वतीने जनगणना २०२७ अंतर्गत फील्ड ट्रेनर तीन दिवसाचे प्रशिक्षण आयोजन आयुक्त महोदय मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनानुसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह, ३रा मजला येथे ६ एप्रिल ते ८ एप्रिल आयोजित करण्यात येत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमास पनवेल महानगरपालिका उपायुक्त अभिषेक पराडकर, जनगणना संचालनालयाचे जिल्हा समन्वयक श्री. अमनकुमार, मास्टर ट्रेनर रूचिता तेलंग यांचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, ७ एप्रिल रोजी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी या प्रशिक्षणास भेट देऊन उपस्थित प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहित केले.जनगणना विभाग प्रमुख रविना येवले यांनी प्रशिक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला.

या तीन दिवसाच्या प्रशिक्षणांतर्गत ४५ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणार्थ्यांमध्ये मनपा शिक्षक व कनिष्ठ अभियंत्यांचा समावेश असून यावेळी प्रशिक्षकांना 'जनगणना २०२७' चे राष्ट्रीय व प्रशासकीय महत्त्व अधोरेखित करण्यात आले. जनगणनेमध्ये फील्ड ट्रेनर्सची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असून ते पुढील स्तरावरील प्रगणक व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देणारे प्रमुख दुवा आहेत, यामुळे हे प्रशिक्षण अत्यंत महत्वाचे असल्याचे सांगितले.

सत्रामध्ये जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया, टप्पे व कार्यपद्धती यांचे सखोल विवेचन करण्यात आले. विशेषतः पहिल्या टप्प्यातील घरयादी व गृहगणना (House Listing & Housing Census - HLH) या घटकावर भर देण्यात आला. घरांची यादी तयार करताना अनुसरावयाची पद्धत, घरांची स्थिती, उपलब्ध सुविधा, व आवश्यक माहिती संकलन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यंदाची जनगणना डिजिटल पद्धतीने होत असल्यामुळे मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर हा प्रशिक्षणाचा मुख्य भाग होता.प्रशिक्षार्थींना जनगणना मोबाईल ॲप डाउनलोड, लॉग-इन प्रक्रिया, तसेच त्यातील विविध मॉड्यूल्सचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. डेटा एंट्री करताना अचूकता राखणे, चुकीची माहिती टाळणे व योग्य पडताळणी करण्याबाबत विशेष सूचना देण्यात आल्या.

एकुणच प्रशिक्षणार्थींना फील्ड ट्रेनर्सना जनगणना प्रक्रियेची सखोल माहिती, डिजिटल साधनांचा वापर, तसेच प्रत्यक्ष फील्डवर आवश्यक असणारी कौशल्ये यांची भक्कम पायाभरणी करण्यात आली.

# तळोजात गरजूंना हेल्मेटचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई वाहतूक पोलीस यांच्या मार्गदर्शनाखाली तळोजा वाहतूक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप चव्हाण यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गरजू नागरिकांना चांगल्या प्रतीचे हेल्मेट उपलब्ध करून देण्यासाठी गंधार कंपनी व गंधार फाउंडेशनच्या वतीने २०० हेल्मेटचे वाटप करण्यात आले.



तळोजा येथील गंधार कंपनीच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हेल्मेट वितरण करण्यात आले. यावेळी गरजू नागरिकांना हेल्मेटचे महत्त्व पटवून देत वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. या उपक्रमासाठी गंधार कंपनीचे चेअरमन रमेश पारेख, डायरेक्टर समीर पारेख व आश्लेष पारेख यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांच्या मागणीनुसार सुमारे दोनशेहून अधिक हेल्मेट तळोजा वाहतूक पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले.

कंपनीचे व्यवस्थापक सुनील पालवे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमास गंधार कंपनीचे व्यवस्थापक सुनील पालवे, दीपक मेवाड, सत्यजित माने, विकास पांडे यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते. तसेच तळोजा वाहतूक पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याणी पाटील, पोलीस कॉन्स्टेबल सानप, मिसाळ आदी उपस्थित होते.

गंधार कंपनी व फाउंडेशनच्या वतीने एमएसआर फंडातून सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून तळोजा वाहतूक पोलिसांच्या या जनजागृती मोहिमेलाही नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

## संपादकीय

# युद्धविरामामुळे दिलासा

पश्चिम आशियातील तणाव, जागतिक अर्थकारणावर होणारे परिणाम आणि महासत्तांच्या राजकीय खेळी या साऱ्यांच्या छायेत घडलेला अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविराम हा केवळ दोन देशांपुरता मर्यादित नसून संपूर्ण जगासाठी महत्त्वाचा टप्पा ठरतो. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर शेवटच्या क्षणी साधलेले दोन आठवड्यांचे युद्धविरामाचे एकमत हे राजनैतिक प्रयत्नांचे यश मानावे लागेल. या घडामोडींनी केवळ युद्ध टाळले नाही, तर जागतिक अस्थिरतेच्या काठावर उभ्या असलेल्या परिस्थितीला तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

**या संघर्षात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा ठरला तो म्हणजे होमूर्झची सामुद्रधुनी. जगातील सुमारे २० टक्के तेलवाहतूक या सामुद्रधुनीतून होत असल्याने इराणने ही सामुद्रधुनी तात्पुरती खुली ठेवण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे तेलाचे दर नियंत्रणात राहण्याची शक्यता निर्माण झाली असून ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरते. इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी अमेरिकेसमोर मांडलेला १० कलमी प्रस्ताव हा या संपूर्ण प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रस्तावात निर्बंध सैल करणे, प्रादेशिक हस्तक्षेप कमी करणे आणि परस्पर आदराच्या तत्त्वावर संवाद सुरू ठेवणे यांसारख्या मुद्द्यांचा समावेश असल्याचे संकेत आहेत. या प्रस्तावावर सकारात्मक चर्चा झाल्यास दीर्घकालीन समाधानाचा मार्ग खुला होऊ शकतो. युद्धामुळे जागतिक पातळीवर अनेक क्षेत्रांवर विपरित परिणाम झाला होता. ऊर्जा बाजारपेठेत अस्थिरता, शेअर बाजारातील घसरण, आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे आणि महागाईत वाढ या सर्व गोष्टींनी सामान्य नागरिकांपासून ते उद्योगजगतापर्यंत सर्वांना फटका बसला. विशेषतः विकसनशील देशांना या परिस्थितीचा अधिक फटका बसतो, कारण त्यांची अर्थव्यवस्था आधीच अस्थिरतेच्या टप्प्यावर असते. त्यामुळे युद्धविरामाचा निर्णय हा आर्थिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताने या युद्धविरामाचे स्वागत करताना संवाद आणि राजनैतिक मार्गाचा आग्रह पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. भारताची परराष्ट्र नीती ही नेहमीच शांतता, सहकार्य आणि संतुलन यांवर आधारित राहिली आहे. पश्चिम आशियात भारताचे आर्थिक आणि सामरिक हितसंबंध मोठ्या प्रमाणात गुंतलेले आहेत. लाखो भारतीय नागरिक त्या भागात कार्यरत आहेत तसेच ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनेही हा प्रदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे या भागात स्थैर्य राखणे भारतासाठी अत्यावश्यक आहे. या संपूर्ण घडामोडीतून एक महत्त्वाचा संदेश स्पष्ट होतो की युद्ध हा कोणत्याही समस्येचा दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही. उलट तो समस्या अधिक गुंतागुंतीच्या करतो. संवाद, परस्पर विश्वास आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य हेच शाश्वत शांततेचे आधारस्तंभ आहेत. अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांनी हे लक्षात घेऊन पुढील वाटचाल करणे गरजेचे आहे. तथापि, हा युद्धविराम केवळ तात्पुरता आहे, हेही लक्षात ठेवावे लागेल. दोन आठवड्यांच्या या कालावधीत जर ठोस प्रगती झाली नाही, तर पुन्हा तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या कालावधीत दोन्ही बाजूंनी संयम राखून सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय समुदायानेही यामध्ये सक्रिय भूमिका बजावणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांनी मध्यस्थीची भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडली, तर या संघर्षाचे कायमस्वरूपी निराकरण होऊ शकते. युद्धविरामाने दिलेला हा दिलासा कायमस्वरूपी शांततेत रूपांतरित होईल का हे येणारा काळच ठरवेल, परंतु सध्याच्या परिस्थितीत हा निर्णय नक्कीच आशादायी आणि स्वागतार्ह आहे.**

# पोलादपूरच्या बाजारपेठेत रानमेवा दुरापास्त



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील रानमेवा आणि वनौषधींची मोठया प्रमाणात निर्यात होत असे. गेल्या काही वर्षांपासून कोळसा निर्मितीसाठी वणवे आणि पाणी साठवण्याच्या नदीतील डवऱ्यांची जागा रेतीमाफियांनी घेतल्यापासून रानमेवा आणि वनौषधी औषधालादेखील राहिली नसल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील महाबळेश्वर रस्त्यावरील आड चांभारगणी भागातील काही व्यापारी जंगलातील आंब्याच्या झाडांवरून दरवर्षी शेकडो टन कैऱ्या आणि तेवढयाच प्रमाणात आंबे वाशी कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये दररोज पोहोचवून व्यापारवृध्दी करीत असल्याचे दिसून येत आहे. वनउपज तपासणी नाक्यांना या निर्यातीशी कोणतेही महसूलवृध्दीचे कारण दिसून येत नसल्याचे अनेक वर्षांपासूनचे सौहार्दपूर्ण वातावरण आहे. गेल्या काही दिवसांपासून आंबे आणि फणसांना अवकाळी पावसाने अपायकारक वातावरण निर्माण केले असून कैऱ्यांचा सडा जमिनीवर पडण्यासाठी आणि फणसांच्या कुयऱ्या सडण्यासाठी हा अवकाळी पाऊस कारणीभूत ठरला आहे. झाडावरून गळून पडलेल्या या मालाची आवक अडते व्यापाऱ्यांच्या काटयावर मोठया प्रमाणात होऊ लागल्याने या परिस्थितीचा फायदा घेताना या घाऊक व्यापाऱ्यांनी खरेदीवेळी भाव कमी लावण्यास सुरूवात केली आहे. परिणामी, शेतकऱ्यांना या व्यापाऱ्यांपर्यंत मालवाहतूक करण्याचा तसेच आंबा, फणस गोळा करण्यासाठीची मजूरी हे खर्च वजा जाता फारच किरकोळ कमाई होऊ लागल्याने शेतकरी वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही अडतदार व्यापाऱ्यांनी ही परिस्थिती फार काळ राहणार नसून हे आंबे आणि फणस झाडावरून अवकाळी पावसामुळे गळून पडल्याने यामध्ये व्यापाऱ्यांचेही नुकसान होण्याची शक्यता असल्याने निर्माण झाली आहे, असे सांगितले आहे. झाडावरून काळजीपूर्वक काढलेले आंबे आणि फणस शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी आल्यानंतर आता घसरलेला भाव वाढण्याची शक्यताही या व्यापाऱ्यांकडून वर्तविण्यात आली आहे. तालुक्यातून दररोज सायंकाळी वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केटमध्ये आंबा आणि फणसांची मोठया प्रमाणात निर्यात करण्यात येत आहे.

रानातील आणि बागायती आंबा उत्पादक शेतकऱ्यांसंदर्भात सरकारचे नियम आणि निर्णय वेगळे असल्याने खासगी मालकी रानातील आंबा उतरविण्यापासून अडतदारांपर्यंत पोहोचविणाऱ्यांसाठी मजूरी देण्यापेक्षा रानातील आंब्याकडे दूर्लक्ष करणेच खासगी मालकी रानाच्या शेतकऱ्यांना योग्य वाटत आहे. यामुळे शेतकऱ्यांना काहीही मिळत नसले तरी खासगी रानातील आंबे उतरविणाऱ्यांना वनविभागाकडूनही प्रतिबंध केला जात नसल्याचे दिसून आले आहे. पोलादपूर तालुक्यातील फणसकोंड, ओंबळी आणि करंजे येथील फणसाचे उत्पादनही पूर्वीप्रमाणे पोलादपूर येथे येऊन वाशी मार्केटला जाण्याऐवजी थेट गावातूनच वाशी मार्केटला माल नेणाऱ्यांच्या दारात फणस पोहोचविण्याची प्रथा निर्माण झाली आहे. त्यामुळे पोलादपूर शहरातील आंबा आणि फणसांची आवक या व्यापाऱ्यांच्या इच्छेवर असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या काही वर्षांपासून पोलादपूरच्या बाजारात काजूबिया सोलून देणाऱ्या आदिवासी महिला कोपऱ्याकोपऱ्यावर आणि नाक्यानाक्यावर दिसून येत असून मे महिन्यामध्ये या महिला ज्याप्रमाणे करवंदं, जांभळी, तोरणं व अन्य रानमेवा घेऊन येत असत तशी परिस्थिती आता राहिली नाही. मे महिन्यामध्ये रानमेवा ओळखीपाळखीतून या महिलांकडून मिळविण्यातच धन्यता मानण्याची वेळ पोलादपूरकरांवर ओढवलेली दिसून येत आहे.

### आंबा उत्पादक शेतकऱ्यांसमोर असंख्य अडचणी

पोलादपूर तालुक्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पावसाने प्रचंड हानी पोहोचवली आहे. विमासंरक्षित बागायतदारांसह हवामानावर आधारित पिकविमा उतरविलेल्या आंबा बागायतदारांवर गेल्या तीन दिवसांपासून सलग सोसाटयाच्या वाऱ्यासह झालेल्या अवकाळीने आंबा बागेत कैऱ्यांचा सडा पाडल्यानंतर विमा भरपाई आणि कच्च्या कैऱ्यांचे पुढे काय करायचे, असे यक्षप्रश्न पडलेले दिसून येत आहेत.पोलादपूर तालुक्यातील आंबा पिकाची अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीपोटी विमा संरक्षित रक्कमेची भरपाई करण्यास बँकांकडून विलंब होत असल्याचा अनेक वर्षांपासूनचा अनुभव गाठीशी असताना आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या विमासंरक्षित आंबा झाडांच्या फळांच्या नुकसानीपोटी बँक खात्यामध्ये जमा होण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांना कृषी विभाग, तहसिल कार्यालय आणि विमा एजन्टसकडे चौकशा कराव्या लागण्याचा आतापर्यंतचा अनुभव मेटाकुटीस आणणारा असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

पोलादपूर तालुक्यातील ४५० हून अधिक हेक्टर क्षेत्रातील आंबा बागायतीपैकी अंदाजे २००० शेतकरी खातेदारांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले. यामध्ये हवामानावर आधारित पिकविमा उतरविलेल्या शेतकऱ्यांचे क्षेत्र अधिक आहे. यासाठी मोठी विमा हप्ता रक्कम शेतकऱ्यांनी भारतीय आयुर्विमा महामंडळाला दिली असून त्यांना एकूण संरक्षित रकमेचा लाभ होणे अपेक्षित असताना या आंबापिक नुकसानीपोटी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पोलादपूर शाखेतर्फे, युनियन बँक ऑफ इंडियाच्या पोलादपूर शाखेतर्फे आणि बँक ऑफ इंडियाच्या पैठण शाखेकडून संरक्षित रक्कम अदा करण्याची गरज आहे. मात्र,बँक खातेदार शेतकऱ्यांना आंबा फळांच्या नुकसानीपोटी रक्कम खातेदारांच्या खात्यावर जमा करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने शेतकरी यंदाच्या अवकाळीच्या नुकसानीची भरपाई कशी विनाविलंब मिळेल, याबाबत चिंताग्रस्त आहेत.

याबाबत काही आंबा उत्पादक शेतकऱ्याने बँक ऑफ इंडियाच्या पोलादपूर शाखेतील अधिकारी अलिबागलाच आहेत, रक्कम आहे पण खात्यावर वर्ग होण्यासाठी ज्या साहेबांची सही आवश्यक आहे, ते साहेब रजेवर गेले आहेत, तुम्हाला कर्ज लगेच मंजूर केले असताना विम्याच्या रकमेबाबत चौकशा का करता, अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन कर्जावर व्याज घेणाऱ्या या बँकींग यंत्रणेने आंबानुकसानी विमा संरक्षणाची रक्कम अदा करण्याबाबत व्याज देण्याची भूमिका न ठेवता टाळाटाळ सुरू केली असल्याची नाराजी व्यक्त केली आहे. यंदा अवकाळी पावसामुळे आंबा बागायतीची हानी झाली असताना सरकारी निकषाप्रमाणे पर्जन्यमापकावर केवळ नगण्य पाऊस झाल्याची नोंद असल्याने नुकसानीचा पंचनामा केला जाईल अथवा कसे, याबाबत महसूल यंत्रणेने अनभिज्ञता दर्शविली असून या अवकाळी पावसाचा आंबा पिकावरही दुष्परिणाम होणार असल्याने आंबा पिक विमा योजनेच्या लाभाबाबतची आतापर्यंतची वाढती दिरंगाई पाहता या विमा योजनेचा लाभ घेण्यास तालुक्यातील अन्य आंबा उत्पादक शेतकरी निरूत्साही असल्याचे दिसून येत आहेत. दुसरीकडे, अवकाळी पावसाने आंबा बागांमध्ये कच्च्या आंब्यांचा सडा पाडल्याने या कैऱ्या लोणचे उत्पादक कंपन्यांना अल्पदरात विकण्याखेरिज आंबा बागायतदारांना गत्यंतर नसल्याचे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. राज्य सरकार सरसकट आंबा लागवडीवर नुकसान भरपाई देईल काय, असा प्रश्न शासनाला पोलादपूर तालुक्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी केला आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळ्यात एसी राहील सुपरकूल; करा ‘हे’ काम

फेब्रुवारी महिना संपला असून तापमानात दररोज वाढ होत आहे. दिवसेंदिवस जसजशी उष्णता वाढेल, तसतसे एअर कंडिशनरची गरज भासू लागेल. जर तुमच्या घरात आधीच एसी असेल तर तो अचानक चालू करण्याऐवजी, आधी काही आवश्यक तयारी करा.खरं तर, जर एसी अनेक महिने बंद राहिला तर त्यात धूळ किंवा घाण जमा होऊ शकते, ज्यामुळे हवेची गुणवत्ता खराब होऊ शकते. ते आपल्या आरोग्यासाठीही हानिकारक आहे. म्हणून, उन्हाळ्यात एसी चालू करण्यापूर्वी काही खबरदारी घ्या. यामुळे एसी व्यवस्थित काम करेल आणि त्याचा तुमच्या आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.




एसी बराच वेळ बंद राहिल्यास त्यात ओलावा आणि घाण जमा होते. याचा त्याच्या कामगिरीवर परिणाम होतो. याशिवाय, जर एसी अनेक महिने बंद राहिला तर त्यात बॅक्टेरिया किंवा बुरशी वाढू शकते आणि त्यामुळे दुर्गंधी येऊ शकते. यामुळे, एसीला खोली थंड होण्यासाठी जास्त वेळ लागेल आणि वीजेचा वापर जास्त होईल, ज्याचा थेट परिणाम तुमच्या खिशावर होईल. त्यामुळे उन्हाळ्यात एसी चालवण्यापूर्वी त्याची सर्व्हिसिंग करून घेणे महत्त्वाचे आहे.

घाणीमुळे आणि देखभालीच्या अभावामुळे, कंप्रेसर ओव्हरलोड होतो ज्यामुळे तो खराब होण्याची शक्यतावाढते. वेळेवर सर्व्हिसिंग न झाल्यास एसीमध्ये गॅस गळती किंवा इतर तांत्रिक समस्या उद्‌भवू शकतात, ज्यामुळे नंतर दुरुस्तीचा खर्च अनेक पटींनी वाढू शकतो.

जर तुमचा एसी नीट काम करत नसेल तर काही चिन्हे आहेत जी सूचित करतात की त्याला सर्व्हिसिंगचीआवश्यकता आहे.जर एसी पूर्वीसारखी थंड हवा देत नसेल. किंवा जर थंड होण्याची गती खूप कमी असेल तर फिल्टर किंवा कॉइलमध्ये घाण जमा झाली असेल. याशिवाय गॅसची कमतरता देखील असू शकते.जर एसी व्यतिरिक्त इतर कोणताही जास्त भार नसेल आणि वीज वापर अपेक्षेपेक्षा जास्त असेल तर याचा अर्थ एसी जास्त भार घेत आहे. जर एसीमधून खडखडाट किंवा क्लिकसारखे असामान्य आवाज येत असतील, तर याचा अर्थ एसीचा काही भाग सैल आहे. अशा परिस्थितीत,शक्य तितक्या लवकर सर्व्हिसिंग करणे चांगले होईल, जेणेकरून कोणतेही मोठे नुकसान टाळता येईल.

# समाजसेवक गणेश वासुदेव जोशी




**निमित्त**

गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका हे महाराष्ट्रातील १९व्या शतकातील एक निष्ठावान सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म ९ एप्रिल १८२८ रोजी सातारा येथे झाला. आर्थिक आव्हानांना तोंड देत असतानाही, त्यांच्या कुटुंबाने शिक्षणाच्या मूल्यावर भर दिला, ज्यामुळे त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांचा पाया रचला गेला. त्यांचे इंग्रजी सातवीपर्यंतचे शिक्षण सातारा येथे झाले. नोकरीच्या निमित्ताने ते पुण्यात आले (१८४८) आणि न्यायालयात कारकून म्हणून रुजू झाले. नंतर त्यांनी वकिलीची परीक्षा दिली (१८६५) आणि पुण्यातच ते वकिली करू लागले. वकिलीबरोबरच त्यांनी सार्वजनिक कामात रस घेतला. बॉम्बे असोसिएशनच्या धर्तीवर पुण्यात २ एप्रिल १८७० रोजी ‘सार्वजनिक सभे’ची स्थापना करण्यात आली.

या संस्थेतर्फे त्यांनी खूप विधायक व समाजोपयोगी कामे केली, त्यामुळे त्यांना ’सार्वजनिक काका’ हे टोपणनाव मिळाले. राजकारणाचे आद्यपीठ किंवा कांग्रेसची जननी म्हणता येईल अशी ’सार्वजनिक सभा’ ही जनतेची गाऱ्हाणी सरकारदरबारी आणि वेशीवर टांगणारी क्रियाशील संस्था होती. ही सभा सनदशीर मार्गाने काम करणारी एक प्रमुख राजकीय संस्था होती. तिचे मुख्य सूत्रधार व पहिले चिटणीस सार्वजनिक काका होते. इ.स. १८७० ते इ.स. १९२० या पन्नास वर्षांच्या काळात, विशेषतः इ.स. १८९६–९७ पर्यंत सार्वजनिक सभेचा राजकीय क्षेत्रावर चांगला प्रभाव होता. या संस्थेचे पालनपोषण पहिली दहा वर्ष मुख्यतः सार्वजनिक काकांनी केले. तिच्यामार्फत विविध उपक्रम करून त्यांनी लोकजागृती केली. सभेचे कार्य घटनानियमांनुसार जरी चालू होते तरी तिच्या सर्व कार्यामागे काकांची प्रेरक शक्ती होती. सभेचे राजकारण हे सनदशीर व इंग्रजांच्या मदतीनेच होणार होते. जोशी आणि रानडे यांनी मिळून आर्थिक, औद्योगिक आणि राजकीय स्वरुपांची अनेक कामे हातात घेतली आणि जनतेला जागृत व संघटित करण्याचे मौलिक काम केले. शिवाय जनतेची गार्हाणी व अडचणी सरकार दरबारी मांडण्याचे प्रयत्न या संस्थेमार्फत सार्वजनिक काकांनी केले.सार्वजनिक काकांनी १८७२ मध्ये स्वदेशी चळवळीचा श्रीगणेशा केला. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या कितीतरी वर्षे अगोदर त्यांनी स्वदेशीची चळवळ सुरू केली होती. १२ जानेवारी १८७२ रोजी त्यांनी खादी वापरण्याची शपथ घेतली व ती आयुष्यभर पाळली. खादीचा वापर व त्याचा जाणीवपूर्वक प्रचार व प्रसार करणारे सार्वजनिक काका हे पहिले द्रष्टे देशभक्त होते.त्यांनी ‘देशी व्यापारोत्तेजक मंडळ’ या संस्थेची स्थापना करून शाई, साबण, मेणबत्त्या, छत्र्या इत्यादी स्वदेशी वस्तूंचे उत्पादन करण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी स्वतः आर्थिक झीज सोसली. जातीभेदाच्या अनिष्ट प्रथेला त्यांचा विरोध होता. त्यांनी १८७१मध्ये पुण्यात ‘स्त्री विचारवती’ या नावाची एक सामाजिक संस्था स्थापन केली. वासुदेव बळवंत फडक्यांच्या खटल्यांचे वकीलपत्र घेणारे गणेश जोशी हे न्या.रानडे यांचे चांगले स्नेही होते अशा या महान सामाजिक कार्यकर्त्याचे २५ जुलै १८८० रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# जेवणात तेल वापरणं बंद केल्यास काय होईल?

भारतीय खाद्यपदार्थांमध्ये तेलाचा वापर सर्वाधिक केला जातो. स्वयंपाकघरातील महत्त्वाचा भाग म्हणजे खाद्यतेल. आपल्या स्वयंपाकघरात सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत जवळपास सर्वच पदार्थ तेलाच्या मदतीने तयार केले जातात. पण जर तुम्ही दोन आठवडे तुमच्या आहारात तेलाचा समावेश केला नाही, तर त्याचा शरीरावर काय परिणाम होतो, तुम्हाला माहीत आहे का,आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा सांगतात, दोन आठवड्यांसाठी तेलाचा वापर पूर्णपणे बंद केला तर पचन आणि चयापचयावर अनेक अल्पकालीन परिणाम होऊ शकतात. तेलामध्ये फॅटी ॲसिड असते, जे चरबी–विद्रव्य जीवनसत्त्वे (ए, डी, ई, के) शोषून घेतात. ते न मिळाल्याने पोषक घटकांचे शोषण बिघडू शकते, ज्यामुळे पोटाच्या हालचालींत बदल होऊन पोटफुगी किंवा बद्‌धकोष्ठता यांसारख्या कमतरता आणि पचनातील अस्वस्थता उद्‌भवू शकते.



आहारातील चरबी कमी केल्याने सुरुवातीला उष्मांक कमी होऊ शकतात, ज्यामुळे वजन कमी होण्याची शक्यता असते. तथापि, यामुळे चयापचय प्रक्रियांमध्येही व्यत्यय येऊ शकतो, ज्यामुळे भूक वाढू शकते. आहारातून पूर्ण तेल काढून टाकल्याने शरीराची चरबी–विद्रव्य जीवनसत्त्वे शोषण्याची क्षमता लक्षणीयरीत्या बिघडू शकते. आवश्यक पोषक घटकांची जैवउपलब्धता कमी होते. दृष्टी, रोगप्रतिकार शक्ती आणि हाडांच्या आरोग्यासारख्या विविध शारीरिक कार्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्याव्यतिरिक्त भाज्यांमधून कॅरोटीनॉइड्ससारख्या इतर पोषक घटकांचे शोषणदेखील चरबीशिवाय कमी होऊ शकते.

खाद्यतेलाचे सेवन वर्ज्य केल्याने शरीरावर होणारे दुष्परिणाम त्वचेच्या आरोग्यात बिघाडः तेल आपल्या शरीराला आवश्यक फॅटी ॲसिड प्रदान करते, परंतु, तेलाचा वापर न केल्याने कोरडेपणा आणि जळजळ होऊ शकते.

पुरेशा ऊर्जेअभावी थकव्यासह सहनशक्तीत घटः शरीराला पुरेशी ऊर्जा न मिळाल्यास व्यक्तींना थकवा जाणवेल आणि सहनशक्ती कमी झाल्याचा अनुभव येऊ शकतो. कारण– चरबी हा घटक तृप्तीचा अनुभव देतो आणि शरीरात सातत्याने ऊर्जा कायम ठेवण्यास हातभार लावतो.

चिडचिडेपणाचा अनुभवः पोषक घटकांचे अपुरे शोषण झाल्यामुळे चिडचिडेपणाचा अनुभव येऊ शकतो.

# खालापूरच्या संभाव्य पाणीटंचाई निवारण आराखड्यात निधीची तरतूद



**खोपोलीः बातमीदार**

सातत्याने पाणी टंचाई ग्रस्त कृती आराखडा यादीत समावेश होणारा खालापूर तालुक्यासाठी आशादायक चित्र निर्माण होत असून मागील पाच वर्षात संभाव्य कृती आराखड्यासाठी तरतूद रकमेत जवळपास अर्धा कोटी ची घट झाली आहे .याशिवाय टंचाई ग्रस्त गावे आणि वाड्यांची संख्या देखील कमी झाली आहे.

खालापूरसाठी संभाव्य पिण्याचे पाणी टंचाई कृती आराखडा २०२५– २६ तयार करण्यात आला आहे. यामध्ये १३ गावे आणि ३१ वाड्यांचा समावेश करण्यात आला असून जवळपास १९लाख३८ हजाराची तरतूद करण्यात आली आहे. उन्हाळ्यात तालुक्यातील काही भागात पाणी टंचाई जाणवते.यंदाच्या टंचाई निवारण कृती आराखड्यात १३ गावे आणि ३१ वाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये नवीन विंधन विहिर दुरुस्ती,टँकरने पाणी पुरवठा करणे,सार्वजनिक विहीर खोल व गाळ काढणे इत्यादी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

टेंभरी ग्रामपंचायत हद्दीत सारंगवाडी येथे विंधन विहीर विशेष दुरुस्ती आणि टेंभरी पाडा येथे विहीर खोल करून गाळ काढणे यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. १३ गावे आणि ३१ वाड्यांसाठी मागणीनुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे एक ऑक्टोंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ पहिला टप्पा, एक जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २६ दुसरा टप्पा व एक एप्रिल २०२६ ते ३० जून २०२६ असा तिसरा टप्पा आहे. तीन टप्प्यात संभाव्य पिण्याचे पाणीटंचाई कृती आराखडा जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आला. सध्या तळवली दांडवाडी येथे टँकरची मागणी ग्रामस्थांनी केली असून आठवडाभरात टँकर सुरू होईल.असे लहू ढोले पाणी पुरवठा विभाग खालापूर पंचायत समिती यांनी सांगीतले

# खोपोलीत महिलेचे साडेतीन लाखांचे दागिने चोरीला; नातेवाईकांवर संशय

**खोपोलीः** मुंबई येथून खोपोलीतील नातेवाईकांकडे आलेल्या राधा हिवाळे या महिलेचे नऊ तोळे ४०० ग्राम वजनाचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली आहे. राधा या एक एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजता शेडवली, मिल्लत नगर येथे पाहुणी म्हणुन गेली होती. तिच्या सोफ्यावर असलेल्या पर्समधील दागिने चोरीला गेले. दागिने नातेवाईकांनी चोरल्याचा संशय व्यक्त केला आहे.

# श्रीवर्धनमध्ये दिव्यांग सहाय्य पोर्टल मार्गदर्शन शिबिराला प्रतिसाद

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा या उद्देशाने केंद्र सरकारच्या दिव्यांग मंत्रालयामार्फत सुरू करण्यात आलेल्या "दिव्यांग सहाय्य पोर्टल" संदर्भात श्रीवर्धन येथे आयोजित मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकता दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या पुढाकाराने सोमवार, दिनांक ६ एप्रिल रोजी पर्यटक निवास संकुलातील 'दिव्यांग कक्ष' येथे हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले.



या शिबिरामध्ये दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे, शासनाने प्रथमच २१ प्रकारच्या दिव्यांगत्वांसाठी असलेल्या सर्व योजनांना एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणल्यामुळे लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उपस्थितांना पोर्टलवर नोंदणी करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची माहिती, अर्ज कसा भरावा, तसेच अर्जाची स्थिती ऑनलाइन कशी तपासावी याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले की, "दिव्यांग सहाय्य पोर्टल ही शासनाची एक महत्त्वाकांक्षी योजना असून, यामुळे दिव्यांगांना विविध कार्यालयांच्या फेऱ्यांपासून आणि कागदपत्रांच्या गुंतागुंतीतून मुक्ती मिळणार आहे. घरबसल्या मोबाईल किंवा संगणकाच्या सहाय्याने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होणार आहे."

शिबिरात सहभागी झालेल्या दिव्यांग बांधवांनी आणि त्यांच्या पालकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. अनेकांनी प्रत्यक्ष नोंदणी करून घेतली, तर काहींनी पुढील प्रक्रियेसाठी आवश्यक माहिती घेतली. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक आणि गतिमान होत असल्याचा अनुभव उपस्थितांनी व्यक्त केला.

या उपक्रमामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील दिव्यांगांपर्यंत शासकीय योजना पोहोचण्यास मोठी मदत होणार असून, भविष्यात अशा प्रकारची आणखी शिबिरे आयोजित करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. एकता दिव्यांग कल्याणकारी संस्था आगामी काळात अधिक व्यापक जनजागृती मोहिमा राबवणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# माणगावात मोफत नेत्र शिबिरात ५५ रुग्णांची तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार दि.८ एप्रिल मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ५५ रुग्णांची तपासणी करून १४ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी आयोजित केले जाते. या शिबिराला सचिन शरद देसाई,अरविंद दोशी,अशोक धारिया,महेंद्र मेथा,ज्योती मेथा,तेजल मेथा यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या सर्व मान्यवरांचे आयोजक विजयशेठ मेथा यांनी स्वागत केले.माणगावात गेली तीन वर्षांहुन अधिक काळात ४६ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



# पोलादपूरच्या ग्रामीण भागात आजही वाळवण पद्धती टिकून

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

कोकणात पावसाळ्याच्या आधी सामानाची बेगमी करण्याची रीत अनेक वर्षांपासून आहे. आजही तंत्रज्ञानाच्या युगात मुख्य ग्रामीण भागात अगोटचे साहित्य भरण्यात येत आहे. कडधान्य सह इतर डाळी, पापड,कुरड्या आदी साहित्य उन्हाळच्या दिवसात खरेदी करत ते कडक उन्हात ठेवत असत त्याला वाळवणे म्हणतात बदलत्या काळात साहित्य रोजच मिळत असल्याने शहरात या संस्कृतीचे प्रकार कमी दिसत असले तरी ग्रामीण भागात आजही वाळवण पद्धती टिकून आहे किंवा जपली जात आहे.



गावातील महिला एकत्र येत ज्या घरात पापड बनवायचे आहेत, त्या ठिकाणी मदतीसाठी येत असतात.उन्हाळा म्हटला की गावोगावीच्या घराघरांमध्ये वाळवणाच्या पदार्थांचा घाट घातला जायचा. त्यात पापड, कुरड्या, वडे, मिरच्या, शेवया, फणसाचे गरे अशा विविध पदार्थांचा समावेश असायचा. हे पदार्थ वर्षभराची बेगमी असायचे. आणि या बेगमीसाठी घरातल्या महिला तर झटायच्याच. पण त्यात मुलांचाही समावेश असायचा. संपूर्ण घरच जणू काही या बेगमीच्या तयारीला लागलेलं असायचं.

कित्येकांच्या घरी उन्हाळ्यात वाळवणाचा कार्यक्रमाचा बेत आखला जातो. गावाकडून मुंबईला स्थायिक झालेल्या बायकादेखील वर्षभराच्या बेगमीसाठी दरवर्षी आठवडाभराची रजाही घेतात. उन्हाचे चटके बसू नयेत किंवा वाळवणाला चांगलं ऊन मिळावं म्हणून हे सगळे पदार्थ सकाळी लवकर उठून केले जातात. कारण ऊन वाढलं की पायाला चटके बसतात. मग ते वाळवणं घालायला त्रास होतो. शिवाय उशिरा वाळवण घातलं की मग त्यांना ऊनही कमी लागतं. मग अंगण, गच्ची आदी कुठेही जिथे वाळवणं घालायची तिथली जागा स्वच्छ केली जाते.

एखादं प्लास्टिकचं भलं मोठं कापड टाकलं जातं. आणि ते उडू नये म्हणून त्याच्या कोपऱ्यावर विटा किंवा दगड ठेवले जातात आणि मग एक दिवस नागलीचे पापड, दुसऱ्या दिवशी नाचणीचे, नंतर उडदाचे पापड, मग साबुदाण्याच्या पापडया आणि चकल्या, वगैरे..उन्हाळी वाळवण हि पुढच्या वर्षभरासाठी केली जाणारी बेगमी म्हणजे साठवणूक असते. महिलांनी आजही पद्धत जपून ठेवलीय. आपली खाद्यसंस्कृती इतक्या विविध खाद्यप्रकारांनी आणि खाद्यपदार्थांनी समृद्ध आहे. त्यात वाळवणाला वेगळं महत्व आहे.

शहरी भागातील अंगणे कमी झाली आहेत त्यातच अनेक महिला रोजच्या लागेल तेवढेच साहित्य खरेदी करत असल्याने साठविण्याची प्रश्न नसल्याने व पापड तयार विकत आणत असल्याने वाळवण संस्कृती शहरात दिसून येत नाही मात्र ग्रामीण भागात ती आजही रुजत असल्याचे पाहवायस मिळत आहे.

यावेळी वर्षभरात येणाऱ्या उपवासाकरिताही साबुदाणा फेण्या बनविल्या जातात. कारण या काळात ते वाळतात चांगले आणि वर्षभर टिकतातही चांगले. खासकरून ग्रामीण भागात ऐसपैस अंगणात वाळत घातलेली पापड कुरडयांची वाळवणं म्हणजे अंगणीची शान वाढविणारी ठरतात. अंगणातील ही वाळवणं आणि त्याच्या देखरेखीसाठी बसलेली लहान मुलं, म्हातारी आजी किंवा घरातील माणसं ही वाळवणं अगदी डोळ्यांत तेल घालून देखरेख करत आहेत. अन्यथा प्राणी, पक्षी त्याचा समाचार घेण्यासही काहीसे सज्ज झालेले असतात. तर शहरी भागातही ही वाळवणं करताना गच्ची, गॅलरीचा आधार घेतला जातो.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत मुळ भुखंडधारक **श्री. जनार्दन विठ्ठल पाटील** यांच्याकडून त्यांच्या लाभांत सिडको संचिका क्र. उलवे १२७० अंतर्गत भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या भुखंडांचे मे. सिडकोकडून भुखंड हस्तांतरणासंदर्भातील पुर्वपरवानगी घेऊन हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे–

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड | १ के | ८ क | २०० चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडांचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पुर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडांचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या आत** सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचे भुखंड हे सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या **पंधरा (१५) दिवसांच्या** मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहू भुखंडासंदर्भातील हस्तांतरण प्रक्रिया तसेच संपूर्ण व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे.

**सही/-**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
मो. नं. ९६१९५०५९५८



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी **मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड** येथील खाली नमुद करण्यात आलेली जमिन मिळकत ही मुळ कब्जेदार/मालक **श्री. रमेश बाबु ठाकुर** यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क. /उपविभाग क. | क्षेत्रफळ (हे. आर. चौ. मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| ३८८/१/४ | ० - १२ - ०० | ० - ०० - ०० | ० - १२ - ०० | ०.६२ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकतीसंदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर उल्लेखित कब्जेदार/मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्बेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती हया सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरच्या जमिन मिळकती हया कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

**सही/-**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
मो. नं. ९६१९५०५९५८


# रेवदंड्यात भाजी मार्केटअभावी विक्रेत्यांना उन्हाळ्यात छत्रीचा आधार



**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात कडक उन्ह डोईवर आले असताना, पारनाका येथील भाजी विक्रेत्यांना सावलीसाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागतो आहे. रेवदंड्यात भाजी मार्केटचा प्रश्न ऐरणीवर असून संबधीत भाजी मार्केटचा प्रश्न सोडविण्यास प्रशासन अपयशी ठरले आहे. गेले अनेक वर्ष भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळ्यांत सावलीसाठी तर पावसाळ्यात पाऊसापासून बचाव करण्यासाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागतो आहे.

सध्यस्थितीत ऐन उन्हाळ्यात कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी भाजी विक्रेते छत्री उघडून भाजी विक्री व्यवसाय करीत आहेत.

रेवदंडा शहर मध्यवर्ती ठिकाण असल्याने आजूबाजूच्या पंचक्रोशीतील भाजी विक्रेते व्यवसायासाठी ताजी भाजी उपलब्ध करीत असतात, ताजी भाजीसह कडधान्ये, चिंच, आंबे, सफेद कांदे, कलिंगडे आजूबाजूच्या बागायतीमधील विविध फळे पारनाका येथील भाजी विक्रेत्यांकडे उपलब्ध असते, सकाळचे कोवळे उन्ह सरताच उन्हाळ्यातील कडक सुर्य किरणे डोक्यावर पडताच सहन होत नाही, अश्या परिस्थितीत भाजी,फळे, कडधान्य आदीचा व्यवसाय साधणे फार जिकीरीचे कठीण बनते. पंचक्रोशीतून भाजी मार्केट मध्ये खरेदी ग्राहक येत असतात त्यांना सुध्दा ऐन उन्हात खरेदी करावी लागते.भाजी मार्केटचा प्रश्न अनेक वर्ष रेंगाळत राहीला असून संबधीत गांर्भियांने पहात नाही.

रेवदंडा शहरात अनेक वर्ष भाजी मार्केट सुविधा नाही, त्यामुळे भाजी विक्रेत्यासह खरेदीदारांना सुध्दा उन्हाळ्यात व पावसाळ्यात त्रास सहन करावा लागतो. भाजी मार्केट प्रमाणे मच्छी मार्केटचा सुध्दा प्रश्न नित्यांने निर्माण करतो आहे. रेवदंडा हायस्कुलच्या बाजूच्या गल्लीत रस्तावर तसेच आत गल्लीत मच्छी विक्री व्यवसाय केला जात आहे. या ठिकाणी नित्याने बाहेरील वाहनांची कोंडी होते तर रेवदंडा समुद्र किनारी ये–जा करताना पर्यटकांना सुध्दा अडथळा निर्माण होतो.

रेवदंडयातील भाजी मार्केट व मच्छी मार्केट हे जिव्हाळ्याचे प्रश्न केव्हा सुटणार असा प्रश्न पंचक्रोशीतील ग्रामस्थ करत आहेत.

## रोहा येथे स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रमाला सुरुवात

**रोहे : प्रतिनिधी**

वरदाई चँरिटेबल ट्रस्ट रोहा यांच्या माध्यमातून सुनील द. तटकरे स्पर्धा परीक्षा अँकँडमी व आय.ई.एस.पी. संस्थेचा उद्‌घाटन सोहळा परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले संकुल रोहा नुकताच झाला होतो.या ठिकाणी आता अभ्यास क्रमाला सुरूवात झाली आहे.

खा. सुनिल तटकरे यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले शैक्षणिक संकुल अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरत असून शिक्षणक्षेत्रात प्रगती करू इच्छीनाऱ्या विद्यार्थ्यांना हि अँकँडमी वरदान ठरत आहे. प्रशस्त लायब्ररी, अद्यावत क्लासरूम, अत्याधुनिक व उच्च शिक्षण प्रणाली असलेले हे शैक्षणिक संकुल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी लाभदायक ठरत आहे. वरदाई लायब्ररी मध्ये रोहा परिसरातील असंख्य विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहेत.वरदाई चँरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेल्या आय.ई.एस.पी. संस्थेच्या माध्यमातून देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळावर काम करण्याची संधी उपलब्ध होत आहे


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे–चाळ, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

- मिळकतीचे वर्णन-

**मौजे : चाळ, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| चाळ | १. बाळाराम रामा पाटील<br>२. गंगुबाई चंदर पाटील<br>३. नंदाबाई रविंद्र कादळेकर<br>४. फशीबाई संजय ठाकुर<br>५. ताईबाई मोतीराम हजारे<br>सर्व रा. घोट, कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड | ६/७ | ०.१३.२०<br>०.०१.५०<br>०.१४.७० | ०.८७ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा–या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांकः ०८/०४/२०२६**

**सही/-**
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**

पत्ता–०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६
मो. क्र. ९६९९४९९९६३



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांची विद्यमान मालक **श्री. ऋषि कपूर** व **पूनम कपूर** यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. ऋषि कपूर** व **पूनम कपूर** यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे संगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : पिरकोन (५५३३३९) (ULPIN : 37303470737), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २१४/५<br>खाते क्रमांक :१४०४ | १ | ०.०९.४०<br>पो.ख. ०.००.०० | १.०६ |
| | | **एकुण ०.०९.४०** | |

**एकुण क्षेत्र ०.०९.४० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०४/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस., भूखंड क्रमांक ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड – ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून

# एप्रिलअखेर आंतरराष्ट्रीय उड्डाणे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (एनएमआयए) येत्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सिडको मंडळाने जाहीर केला आहे. देशांतर्गत उड्डाणांना मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता नवी मुंबई थेट जागतिक हवाई नकाशावर झेप घेण्यास सज्ज झाली आहे.



गेल्या आर्थिक वर्षात या विमानतळाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या कार्यान्वित झाला. ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर २५ डिसेंबरपासून देशांतर्गत विमानसेवा सुरू करण्यात आली. सध्या देशातील ७६ शहरांशी जोडलेल्या या विमानतळावरून दररोज सुमारे १५० विमानांची ये-जा होत असून दररोज जवळपास १९ हजार प्रवासी प्रवास करत आहेत.

या पार्श्वभूमीवर सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी २०२६-२७च्या अर्थसंकल्पात आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याचा ठोस आराखडा मांडला आहे. या आराखड्यानूसार यापुढील सर्व विकासाची पायाभरणी विमानतळ भोवतालच्या क्षेत्रातच करण्याचा मानस सिडकोने व्यक्त केला आहे. एप्रिल अखेरपर्यंत आंतरराष्ट्रीय विमान वाहतूकीची सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यामुळे नवी मुंबईची जागतिक संपर्कक्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

विमानतळाच्या पहिल्या टप्प्यात दरवर्षी दोन कोटी प्रवासी आणि ०.५ दशलक्ष टन मालवाहतुकीची क्षमता निर्माण करण्यात आली आहे. ३,७०० मीटर लांबीची धावपट्टी मोठ्या वाइड-बॉडी विमानांच्या उड्डाणासाठी सक्षम असून भविष्यातील वाढत्या हवाई वाहतुकीसाठी भक्कम पायाभूत सुविधा तयार करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, पुढील टप्प्यात टर्मिनल-२, सेंट्रल टर्मिनल कॉम्प्लेक्स, मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब आणि जनरल एव्हिएशन टर्मिनल उभारण्याची योजना आहे. तसेच वॉटर टॅक्सी सेवा आणि फेडएक्स कार्गो हब सुरू करण्याचाही प्रस्ताव विचाराधीन आहे.आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या प्रारंभामुळे नवी मुंबई केवळ देशांतर्गतच नव्हे, तर जागतिक स्तरावरही महत्त्वाचे हवाई केंद्र म्हणून उदयास येणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

## खारघरमध्ये सलग दोन रात्री विजेचा लपंडाव

**पनवेल : वार्ताहर**

ऐन उकाड्यात सलग दोन रात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने खारघरमधील हजारो नागरिकांना अंधार, उकाडा आणि डासांच्या त्रासाचा सामना करावा लागला. अचानक बिघडलेल्या महावितरणच्या व्यवस्थेमुळे उपनगरातील अनेक भागांमध्ये वीज पुरवठा खंडित झाला. यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

रविवारी रात्री सुमारे अकराच्या सुमारास गेलेली वीज सोमवारी पहाटेपर्यंत सुरळीत झाली नाही. त्यानंतर सोमवारी रात्री पुन्हा सेक्टर १९ व २० परिसरात वीजपुरवठा खंडित झाला आणि मध्यरात्री उशिरा तो पूर्ववत करण्यात आला. महावितरणच्या वीज व्यवस्थेत अचानक झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. विशेष म्हणजे रविवारी मध्यरात्री तळोजा औद्योगिक वसाहतीतही वीजपुरवठा खंडित झाला होता. याबाबत खारघर परिसरातील नागरिकांनी महावितरणकडे तक्रार करून उन्हाळ्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी केली आहे.



**उकाड्याने नागरिक हैराण**

दरम्यान, महावितरणच्या खारघर विभागाचे उपकार्यकारी अभियंत्यांनी सांगितले की, सोमवारी उपकेंद्रात अचानक तांत्रिक बिघाड झाल्यानंतर तातडीने तंत्रज्ञ आणि कामगारांच्या मदतीने दुरुस्तीचे काम पूर्ण करून वीजपुरवठा सुरू करण्यात आला. तसेच ४० केव्ही पुरवठा लाईनमध्ये अडचण निर्माण झाल्याने पर्यायी व्यवस्था उभी करून दोन तासांत वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. २० हजार ग्राहक काळोखात

खारघर उपनगरात सुमारे ९० हजार वीज ग्राहक आहेत. महावितरणच्या वीज वाहिनीमध्ये रविवारी झालेल्या बिघाडामुळे सुमारे २० हजार ग्राहकांना अंधार आणि उकाड्याचा सामना करावा लागला. तर सोमवारी रात्री पुन्हा सुमारे ३ हजार ग्राहक वीज समस्येमुळे त्रस्त झाले. सध्या शैक्षणिक संस्थांमध्ये परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे अभ्यास आणि झोप यावरही परिणाम झाला आहे.

## उरणमध्ये मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहीम

**उरण : प्रतिनिधी**

गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर होऊ नये म्हणून १४ वर्षांवरील वयोगटातील मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहीम शासनाने हाती घेतली आहे.



कोणत्याही शासकीय रुग्णालयात ही लस उपलब्ध आहे. त्यामुळे पालकांनी मुलींच्या भविष्याची काळजी घेऊन कॅन्सर प्रतिबंधक लस घेण्याचे आवाहन उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक बाळासो कालेल यांनी केले आहे. हल्लीच्या काळात मुली वयात येण्याआधीपासुनच गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे भविष्यात पालकांनी मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरपासुन दूर ठेवण्यासाठी वेळीच खबरदारी घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

यावर उपाययोजना म्हणून केंद्र, राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून १४ वर्षांवरील वयोगटातील मुलींना एचपीव्ही लस देण्याची मोहीम शासनाने हाती घेतली आहे. युएसई देशातील कंपनीच्या एचपीव्ही लसीची बाजारात किंमत चार हजार पाचशे रुपये किंमत आहे, मात्र शासनाकडून मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या लसीकरणाचे कोणत्याही प्रकारचे साईड इफेक्ट नाहीत. त्यामुळे ही एकमेव लस वयात आलेल्या मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरपासुन दूर ठेवण्यासाठी व मुलींच्या भविष्य सुरक्षिततेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे.

त्यामुळे पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता १४ वर्षांवरील मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरपासुन दूर ठेवण्यासाठी शासकीय रुग्णालयात लसीकरण करून घ्यावे. यासाठी मुलीच्या वयाचा दाखला, आधार कार्ड आदी कागदपत्रे सोबत घेऊन येण्याचे आवाहन उरण येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक बाळासो कालेल यांनी उरणकरांना केले आहे.काही शंका असल्यास १४१ क्रमांकावर संपर्क साधुन शंकांचे निरसन करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## खांदा कॉलनी येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

अ‍ॅकडमीला जाते असे सांगून गेलेली १९ वर्षीय तरुणी परत घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

खांदा कॉलनी येथे राहणारी पायल भाष्टे ही तरुणी पनवेल येथे अँकडमीसाठी खांदा कॉलनी येथिल बस स्टॉपवर खोपोली गावाकडे जाणा-या एनएमएमटी बस मध्ये अँकडमीला जाते असे सांगून गेली मात्र ती परत घरी परतली नाही. याबाबत तिच्या पालकांनी ती हरवल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार एच.एस. शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## १४ गावांसाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करा

### भाजप नगरसेविका प्रतीक्षा पाटील यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेत काही महिन्यापूर्वी समाविष्ट झालेल्या १४ गावांना अर्थसंकल्पात भरीव तरतूद करून या गावाचा सर्वांगीण विकास करावा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका प्रतीक्षा पाटील यांनी अर्थसंकल्पीय चर्चेत केली आहे.



अर्थसंकल्पावर बोलताना नगरसेविका पाटील म्हणाल्या की, १४ गावांचा सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करावा. याठिकाणी असणारी ४०० ते ४५० एकर शासकीय जमिन महापालिकेने ताब्यात घेऊन त्याठिकाणी रुग्णालय, नागरिकांसाठी नागरी आरोग्य केंद्र, शाळा, बहुउद्देशीय इमारत, खेळाडूकरिता क्रीडांगण, नागरिकांसाठी उद्यान उभारावे, याठिकाणी १ ली ते ७ वीच्या ३ शाळा, पहिली ते चौथी ११ शाळा असून त्या शाळा पालिकेने ताब्यात घेऊन शालेय सुविधा द्याव्यात, येथील तलाव, विहिरी पुनर्जीवित करून जलस्त्रोत उपलब्ध करावे, ग्रामपंचायत कालीन दफ्तर ताब्यात घेऊन त्याठिकाणी पालिकेच्या माध्यमातून मालमत्ता आणि पाणी पट्टी आकारणी करून कर वसुली सुरू करावी, ग्राम पंचायती मार्फत दिले जाणारे जन्म मृत्यू दाखले गावे पालिकेत समाविष्ट करण्यात आल्याने बंद करण्यात आले असून पालिकेने पुढाकार घेऊन दाखले देणे सुरू करावेत, व्यावसायिक गाळ्यांना कर आकारणी करून वसुली सुरू करावी त्याच प्रमाणे स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेविका प्रतीक्षा पाटील यांनी केली आहे.

कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील १४ गावे ७ मार्च २०२४ च्या अधिसूचनेनुसार नवी मुंबई महानगरपालिकेत अधिकृतपणे समाविष्ट करण्यात आली आहेत. या गावांमधील पायाभूत सुविधा महापालिकेने देऊन एक आदर्श नगरी म्हणून विकसित करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया १४ गाव सर्वपक्षीय विकास समितीचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील यांनी दिली.

> **नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट झाल्याने दीर्घकाळ विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या १४ गावांच्या विकासाला गती मिळणार आहे. अर्थसंकल्पातून नागरिकांना अपेक्षित पायाभूत सोयी सुविधा देण्याच्या अनुषंगाने पालिकेकडे लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात मागणी केली आहे.**
> **-प्रतीक्षा पाटील,** भाजप नगरसेविका (प्रभाग १४)

## सुरक्षारक्षकांना प्राधान्याने सामावून घेण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाकडून गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सव काळात तात्पुरती सेवा दिलेल्या सुरक्षारक्षकांना पनवेल महापालिकेच्या वाढीव सुरक्षा रक्षक मागणीत प्रथम प्राधान्याने सामावून घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी पालिका आयुक्त यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्र तसेच सिडको कार्यक्षेत्रामध्ये २०२४-२०२५ रोजीच्या गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव काळात सिडको मार्फत वाहतूक नियंत्रण पोलीस खाते अंतर्गत दोन ते तीन महिने रस्त्यावरील वाहनांच्या वाहतूक कोंडी व नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांना मदतनीस म्हणून रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांनी काम केले. यावेळेस सुरक्षारक्षकांनी आपले कर्तव्य उत्कृष्टरित्या बजावले. पोलीस कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून जनतेच्या सेवा सुरक्षा रक्षकांनी केल्या.

दोन-तीन महिन्यांच्या सेवेचा सुरक्षारक्षकांना हक्काचा वेतन रुपी मोबदलादेखील पूर्ण मिळाला नसल्याचे विनायक गांधी यांनी म्हटले आहे. या सुरक्षारक्षकांनी स्वतःच्या गरजेपोटी कोणताही सण, उत्सव न बाळगता तत्पुरत्या स्वरूपाचे प्रामाणिकपणे काम हाताळले. त्यानंतर आजतागायत कामासाठी नियुक्ती न मिळाल्याने ते कामाच्या प्रतीक्षेत आहेत. तरी महापालिकेकडून वाढीव सुरक्षारक्षकाची मागणी सुरक्षारक्षक मंडळाकडे केल्यास प्रथम प्राधान्याने या सुरक्षारक्षकांना संधी देण्यात यावी, अशी मागणी गांधी यांनी आयुक्त, महापौर, उपमहापौर यांच्याकडे केली.



**पनवेल :** सेक्टर ११ प्रबोधन व उत्कर्ष सोसायटीच्या कमिटी सदस्यांनी महापौर नितीन पाटील यांची भेट घेतली. या भेटीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार फंडातून जो सोसायटीला निधी मंजूर झाला आहे त्या निधीतून होणारे काम त्वरित सुरु करावे, असे निवेदन देण्यात आले. यावेळी भाजपचे नवीन पनवेल शहर सरचिटणीस भिमराव पोवार, प्रबोधन सोसायटीचे सचिव महामुलकर, सहाय्यक गमरे, उत्कर्ष सोसायटीचे पदाधिकारी शशिकांत गायकवाड तसेच सुभाष गाडगे, हसूराम शिवकर आदी उपस्थित होते. महापौरांनी पालिकेचे इंजिनियर कर्डिले यांना बोलावून या कामांमध्ये लक्ष घालून लवकर काम करण्याचे आदेश दिले.

## चांगला आहार हेच माणसाच्या आयुष्यातील उत्तम औषध -डॉ. वाघ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगला आहार हेच माणसाच्या आयुष्यातील उत्तम औषध आहे, असे प्रतिपादन आहारतज्ञ डॉ.स्वप्नील वाघ यांनी डायमंड स्पिरीट फाऊंडेशनच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या समारंभात केले.

डायमंड स्पिरीट फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त पनवेलच्या शांतिवनातील कुष्ठरोग निवारण समितीच्या सभागृहामध्ये आयोजित केलेल्या समारंभासाठी कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, अल्क्युविया कंपनीचे संचालक रमेश भुकन, शांतीवनाचे कार्यवाह नंदकिशोर उरणकर, शांतीवनाचे शिबिर प्रमुख नीलकांत कोळी, सिप्ला कंपनीचे सीनियर मॅनेजर ज्ञानेश्वर धनावडे, डायमंड स्पिरिट फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा नम्रता धनावडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



या कार्यक्रमांमध्ये फाउंडेशनने आपली सामाजिक बांधिलकी जपत खऱ्याअर्थाने शांतीवनातील कुष्ठरोग निवारण केंद्रामधील रुग्णांसाठी जेवण, आहारविषयक व्याख्यान आणि मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले.

यापुढे बोलताना डॉ.स्वप्निल वाघ म्हणाले की, औषधांवर अवलंबून राहण्यापेक्षा योग्य आहार आणि नियमित व्यायाम यांचा अवलंब केल्यास अनेक आजार टाळता येऊ शकतात तसेच पुरेशी झोप आणि मानसिक ताण कमी ठेवणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार गणेश कोळी, शांतीवनाचे शिबिर प्रमुख नीलकांत कोळी यांची भाषणे झाली. डायमंड स्पिरिट फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा नम्रता धनावडे यांनी आपल्या प्रास्ताविकात, फाऊंडेशनच्या चार वर्षांच्या कार्याचा आढावा सांगितला. आमच्या फाउंडेशनच्या समाजसेवेचे व्रत हे निस्वार्थी आहे. शाब्दिक आधार देण्यापेक्षा दुसऱ्यांची दुःखे जाणून त्यात प्रत्यक्ष कृती करून, त्यांची दुःखे कमी करणे या प्रामाणिक हेतूने आज आम्ही काम करत आहोत असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी शुभदा भुकन, उज्वला राले, अलका आव्हाड, सौजन्य पास्ते, आदिती उपासनी, शोभा ठोंबरे, कल्पना पाटील, क्रांती जाधव, लता पटेल, शर्मिला पटेल, सुवर्ण अनावकर, अपर्णा कीचक, ज्योती जैन, सुखदा पाटील या फाउंडेशनच्या सदस्या उपस्थित होत्या.

## गंभीर आजारावर महिलेची मात

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील मदरहुड हॉस्पिटलमध्ये गंभीर एंडोमेट्रिओसिस, अंतर्गत अवयवांची गुंतागुंत आणि कमी स्त्रीबीजसंख्या असूनही ३१ वर्षीय महिलेने निरोगी बाळाला जन्म दिला. गेल्या काही वर्षांपासून ती मासिक पाळीदरम्यान तीव्र वेदना सहन करत होती. सुरुवातीला हा सामान्य त्रास असल्याचे तिने गृहीत धरले, मात्र गर्भधारणेचा प्रयत्न करताना समस्या गंभीर असल्याचे स्पष्ट झाले.

तपासणीत एंडोमेट्रिओटिक सिस्ट्स, अवयवांमध्ये चिकटपणा आणि लो ओव्हेरियन रिझर्व्ह आढळले. यामुळे नैसर्गिक गर्भधारणा कठीण होती. डॉ. सुरभी सिद्धार्थ आणि त्यांच्या टीमने लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया करून सिस्ट्स काढून टाकल्या व चिकटलेले अवयव वेगळे केले. त्यानंतर हार्मोनल उपचार देण्यात आले.

डॉ. सुरभी सिद्धार्थ म्हणाल्या, संपूर्ण गर्भधारणेदरम्यान विशेष काळजी घेण्यात आली. अवयवांतील गुंतागुंत लक्षात घेऊन नियोजित सिझेरियनद्वारे तिने ३.१ किलो वजनाच्या निरोगी मुलीला जन्म दिला.

## लोकनेते दि.बा. पाटील इंग्रजी माध्यम शाळेत प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व आय.टीच. स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता लोकनेते दि. बा. पाटील इंग्रजी माध्यम शाळेत इयत्ता ४ थी ते ७ वी या वर्गांमध्ये रिक्त असलेल्या जागांसाठी विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रवेश अर्ज भरण्याचा प्रारंभ दिनांक : १०/०४/२०२६ (सकाळी १०.०० वाजल्यापासून) प्रवेश अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक : २४/०४/२०२६ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) प्रवेशासाठी लॉटरी दिनांक : २७/०४/२०२६ - अर्ज भरण्याची वेळ : सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत

इच्छुक विद्यार्थ्यांनी व पालकांनी नमूद कालावधीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. अर्ज करण्यासाठी पत्ता : लोकनेते दि. बा. पाटील इंग्रजी माध्यम शाळा, आगरी समाज हॉल जवळ, दांडेकर क्लिनिक समोर, पनवेल ४१०२०६ संपर्क क्रमांक : ७७१००८३८७७

**रिक्त जागांचा तपशील :**

इयत्ता ४ थी : मुली १, मुले ३ (एकूण ४)

इयत्ता ५ वी : मुली ६, मुले ० (एकूण ६)

इयत्ता ६ वी : मुली ०, मुले ३ (एकूण ३)

इयत्ता ७ वी : मुली १, मुले १ (एकूण २)

एकूण रिक्त जागा : १५ (मुली ८, मुले ७)

## विश्वासभाईंचा वाढदिवस विशेष मुलांसोबत साजरा



**उरण : वार्ताहर**

वाढदिवसाच्या दिवशी फुलांचे बुके, बॅनर लावणे, नको तिथे पैसे खर्च करणे त्यापेक्षा आपला वाढदिवस वेगळा साजरा करण्याचा प्रयत्न विश्वासभाई यांनी केला आहे. त्याचप्रमाणे ते दर वर्षी साजरा करीत असतात.

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक येथील दर वर्षा प्रमाणे प्रजापिता ब्रम्हकुमारी गीता पाठशाळेचे विश्वासभाई यांनी आपला ७४वा वाढदिवस मंगळवारी (दि. ७) बोरी येथील स्वामी ब्रम्हानंद प्रतिष्ठान सी.बर्ड स्पेशल स्कूल बोरी (उरण) येथे साजरा केला.

या वेळी विश्वासभाई यांनी वेळी ३० ते ३५ मुलांना बिस्किटे व चॉकलेट खाऊ वाटप केले. शाळेला मदत म्हणून एक हजार एकशे अकरा रुपयांचा (१,१११ रुपये) धनादेश (चेक) शाळेच्या मुख्य शिक्षिका पल्लवी परदेशी यांच्याकडे सुपूर्त केला. पल्लवी परदेशी यांनी विश्वासभाई यांचे आभार मांडले. मुलांनी आनंद व्यक्त केला.

या वेळी शाळेच्या मुख्य शिक्षिका पल्लवी परदेशी, विशेष शिक्षक राकेश म्हात्रे, शिक्षक वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.

# रेवदंड्यात सतत वाहतूक कोंडी

## पार्किंगच्या असुविधेमुळे नागरिकांना मनस्ताप



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेत बेशिस्तीने केलेल्या लहान मोठया वाहनांच्या पार्किंगने नित्याने वाहतुक कोंडी निर्माण होते, त्यामुळे पार्किंगच्या असुविधेने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतुक कोंडीची समस्या ऐरणीवर असते.

अलिबाग,मुरूड व रोहा तालुक्याला रेवदंडा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून वाहनांची जा–ये मोठया प्रमाणात आहे, विशेषतः मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस असल्याने येथून पर्यटक मोठया प्रमाणात येत असतात, त्यांना रेवदंडा मार्गेच मुरूडकडे जा–ये करावी लागते. रेवदंडा बाजारपेठ सुमारे दोन किमी अंतरामध्ये वसलेली आहे, या बाजारपेठेतील रस्ता अंत्यत अंरूद आहे. त्यामुळे वाढत्या वाहतुकीचा ताण रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला नेहमीच असतो.

रेवदंडा बाजारपेठेतील अगोदरच अरूंद असलेल्या रस्ता वाहनांची जा– ये करताना नित्याने वाहने व प्रवासीवर्गाला वाहतुक कोडींच्या समस्येला सामोरे जावे लागते. विशेष म्हणजे रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला कुठेही पार्किग सुविधा नसल्याने जा–ये करणारा वाहनांना बाजारपेठेत बेशिस्तीने पार्किग केलेल्या वाहनाचा अडथळा होतो, व वाहतुक कोंडी निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील गावे, व रेवदंडा पंचक्रोशीतील गावे अवंलबून आहेत, त्यामुळे रेवदंडा बाजारपेठ नित्याने गर्दीचे ठिकाण आहे. येथे बाजारपेठेत खरेदीसाठी नित्याची गर्दी असते, बाजारपेठेतील अरूंद रस्तात मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने बेशिस्तीने पार्किग केली जातात, त्यामुळे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याने जा–ये करणाऱ्या मोठया बसेस, मालवाहतुक ट्रक यांना अडथळा निर्माण होतो, त्यामुळे वाहतुक कोंडी नित्याने होते. मुख्यः रस्ता अरूंद असल्याने पार्किग समस्या सुध्दा निश्चितच जाणवते. बाजारपेठेतील अरूंद रस्तात पार्किग सुविधा उपलब्ध होत नसल्याने बाजारपेठेत गर्दीच्या वेळी रस्त्यात वाहतुकीची कोंडी निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताने दोन मोठी वाहने पास होताना फारच जिकीरीचे असते,शिवाय रस्त्यात उभी केलेली लहान मोठी वाहने वाहनांच्या जा–ये करताना अडथळा निर्माण करतात. या रस्ताने मिनिटागणीत वाहने जा–ये करत असल्याने बेशिस्तीने केलेल्या पार्किंगने वाहतुक कोंडी निर्माण होते. रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुलदरम्यान नित्याने वाहतुक कोंडीची समस्या असते.

विशेषतः केळकर स्टॉप, अर्बन बँक, पारनाका, ते पुढे रेवदंडा हायस्कुल पर्यंत नित्याची वाहतुक कोंडी निर्माण होत असते. रेवदंडा बाजारपेठेतील गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुल या एक किमी अरूंद रस्त्याच्या अंतरामध्ये कुठेही पार्किग सुविधा नसल्याने ही वाहतुक समस्या निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद असलेल्या रस्ताला पार्किग सुविधा नसल्यानेच वाहतुक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते, बाजारपेठेत खरेदी साठी मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने येत असतात, त्यांना पार्किग सुविधा अत्यंत गरजेची आहे. पार्किंग सुविधा नसल्याने बेशिस्तीने वाहने पार्किग करून ठेवल्याने वाहतुक कोंडी निर्माण होते.

### *बाजारपेठेत वाहनांची भली मोठी रांग*

*बाजारपेठेतील नित्याने होत असलेल्या कोंडीने पोलिसांना सुध्दा डोकेदुखी ठरते, नित्याने येथे ट्रफिक पोलिसांची नित्यांत आवश्यकता असते. या ट्रफिक पोलिसांना रस्त्यात बेशिस्तीने पार्किंग केलेली वाहने हटवावी लागतात, त्यावेळी वाहतुक कोंडी सुटते. मात्र तोपर्यंत वाहनांची भली मोठी रांग बाजारपेठेत लागलेली दिसते. रोज व नित्याने रेवदंडा बाजारपेठेत होणारी वाहतुक कोंडी दुर करण्यासाठी संबधीताने पार्किंग सुविधेचा प्रश्न सोडविणे फारच गरजेचे आहे.*

# पोलादपूर तालुक्यात उन्हाळ्यामध्ये अग्निशमन यंत्रणेची आवश्यकता

## वणवे, शॉर्टसर्किट व अचानक पेट घेण्याच्या घटनांत वाढ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात उन्हाळयाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे वणवे लागण्यासोबतच शॉर्टसर्किट आणि अचानक पेट घेण्याच्या घटनांमध्ये सातत्य निर्माण होऊन वाढ झाल्याने पोलादपूर तालुक्यात उन्हाळयामध्ये अग्निशमन यंत्रणेची आवश्यकता भासू लागली आहे. पोलादपूर तालुक्याच्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर सुसज्ज अग्निशमन यंत्रणा कार्यरत होण्याच्या अपेक्षेचा भंग झाल्याने महाड एमआयडीसी, महाड व खेड नगरपालिकेच्या अग्निशमन यंत्रणा घटनास्थळी दाखल होईपर्यंत आगीमुळे भस्मसात होण्याचे प्रकार घडत असल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील धामणदेवी येथे मोर उडताना मोराचा पाय विद्युत वाहक तारेला लागल्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन सुनील माने यांच्या वाडयाला आग लागण्याची घटना गेल्या शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. धामणदेवी येथील सुनील माने यांच्या वाडयाला अचानक आग लागल्याने ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत हंडा बादली व मिळेल त्या भांड्याने आगीवर पाणी मारत आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र जवळ गुरांचा पेंढयाच्या उडवीतील सुमारे दीड हजार पेंडा उडवीवर असल्याने आगीने उग्र धारण केले.

वाड्याबरोबरच सुनील माने यांच्या गिरणीचा दरवाजाही आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. ग्रामस्थांनी आग विझविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला. ग्रामस्थांनी तत्काळ महाड नगर परिषद व महाड एमआयडीसीच्या अग्निशमन यंत्रणेला पाचारण केले. दरम्यान, महाड नगरपरिषदेची फायर ब्रिगेड घटनास्थळी दाखल झाल्यानंतर पेंढा जळून खाक झाला, मात्र आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

दुसऱ्या घटनेमध्ये लोहारे ग्रामपंचायत हद्दीत सोमवारी दुपारी प्रखर उन्हात लागलेल्या वणव्यामुळे महावितरण कंपनीच्या केबलसह यंत्रप्रणालीचे नुकसान झाले. सद्यस्थितीत पोलादपूर तालुक्यात वणवा लागण्याचे प्रमाण अधिक असून सर्वत्र डोंगर भागात वणवे लागल्याने त्याचा फटका आंबा बागायतदारांसह छोटे मोठया फळबागायतदारांनी बसत आहे. देऊळकोंड येथे वणवा आल्याने विजेचा खांब आगीच्या ज्वाळांनी वेढला गेला. त्यामुळे खांबावरील ट्रांसफार्मर तात्काळ बंद करून काही तास या विभागातील विद्युत पुरवठा बंद करण्यात आला. यामुळे महावितरणची यंत्रप्रणालीसह विद्युत वाहिनी व ओव्हरहेड केबल यांचे नुकसान झाले.

पोलादपूर तालुक्यात कोठेही आगीची घटना उदभवल्यास पोलादपूर नगरपंचायतीकडे कोणतीही अग्निशमन यंत्रणा अथवा सुविधा नसल्याने महाड व खेड नगरपालिकेच्या अग्निशमन यंत्रणेसह महाड औद्योगिक वसाहतीतील अग्निशमन विभागाला पाचारण केले जाते. मात्र, संबंधित अग्निशमन यंत्रणा व जवान घटनास्थळी दाखल होईपर्यंत जनावरे, गुरांचा चारा, गुरांचे वाडे, घरे तसेच आंब्याच्या बागा व अन्यप्रकारचे अतोनात नुकसान होत आहे. तालुक्यात किमान उन्हाळयामध्ये अग्निशमन यंत्रणा तैनात ठेवण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे.

# खोपोलीतील अनधिकृत शाळांवर कारवाईची मागणी

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहराच्या हद्दीत काही शाळा अनधिकृत (बिनपरवाना / बांधकाम परवानगीविना) इमारतीत चालू असल्याची माहिती समोर आली आहे . या अनाधिकृत शाळा इमारतींमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे तसेच बांधकाम नियम, शिक्षण नियमावली आणि न्यायालयांचे आदेशाचे उल्लंघन होत असल्याने अशा शाळा त्वरित बंद कराव्यात व कारवाई करावी, अशी मागणी नगरपालिकेचे माजी नगरसेवक किशोर पानसरे यांनी केली आहे.

खोपोली नगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळांची,यामध्ये खासगी/अनुदानित/स्वतंत्र शाळांची, बांधकाम परवानगी, नकाशा मंजुरी आणि वापर प्रमाणपत्र (Occupancy/ Completion) यांची तात्काळ तपासणी करावी, अनधिकृत बांधकाम, परवानगीविना मजले, धोकादायक इमारत किंवा नियमबाह्य वापर आहे अशा बांधकाम नियमांची पायमल्ली करणाऱ्या शाळांवर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करावी आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन करावे, अधिकृत परवानगी न देता शाळा सुरू होऊ दिलेल्या जबाबदार अधिकारी/पदाधिकारी यांच्यावरही कारवाई करावी, खोपोली शहरातील सर्व अनधिकृत शाळा बांधकामांविरुद्ध तत्काळ व निष्पक्ष कारवाई करण्यात यावी, अशी लेखी मागणी माजी नगरसेवक किशोर पानसरे यांनी खोपोली मुख्याधिकारी पंकज पाटील यांना केली आहे.

# शिरवणे येथे पं. दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान शिबिर

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यातील शिरवणे गावात भारतीय जनता पक्षातर्फे आयोजित करण्यात आलेले पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान शिबिर अत्यंत भव्य व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. तालुक्यातील तसेच परिसरातील विविध गावांमधून हजारोंच्या संख्येने भाजप कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून या शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.



या शिबिरात सकाळपासूनच कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उसळली होती. गावोगावातून आलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला होता. संपूर्ण शिरवणे परिसर भगव्या झेंड्यांनी सजला होता आणि वातावरणात पक्षनिष्ठा व उत्साह स्पष्टपणे जाणवत होता. या आयोजनामुळे श्रीवर्धन तालुक्यात भाजपची संघटनात्मक ताकद आणि वाढता प्रभाव अधोरेखित झाला.

शिबिरादरम्यान विविध मान्यवर नेते व पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारसरणीवर आधारित 'अंत्योदय' या तत्त्वाचा विशेष उल्लेख करत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हेच पक्षाचे मुख्य ध्येय असल्याचे सांगण्यात आले. कार्यकर्त्यांना पक्षाच्या धोरणांची सखोल माहिती देण्यात आली तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन बळकट करण्याचे आवाहन करण्यात आले.

प्रशिक्षण शिबिरामध्ये कार्यकर्त्यांना प्रभावी जनसंपर्क कसा वाढवायचा, सोशल मीडिया व तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करायचा, तसेच मतदारांशी संवाद साधताना कोणत्या मुद्द्यांवर भर द्यायचा याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतले.

# जलचर दिनानिमित्त विद्यार्थ्यांना उलगडले मगर संवर्धनाचे महत्त्व

## सिस्केप आणि प्रिव्ही कंपनीचा उपक्रम



**महाड : प्रतिनिधी**

जलचर प्राण्यांच्या संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने शिरगाव येथील शं. बा. सावंत माध्यमिक विद्यालयात 'जागतिक जलचर प्राणी दिना'निमित्त मगर संवर्धन विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सिस्केप संस्था, महाड व प्रिव्ही स्पेशालिटी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

दरवर्षी ३ एप्रिल रोजी साजरा होणाऱ्या 'जागतिक जलचर प्राणी दिना'चे औचित्य साधून १ ते ६ एप्रिल या कालावधीत विविध ठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांना जल परिसंस्था, त्यातील जैवविविधता आणि संवर्धनाचे महत्त्व दृकश्राव्य माध्यमातून समजावून सांगण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रेमसागर मेस्त्री व परीक्षित चिमणकर यांनी मगर या प्राण्याविषयी सविस्तर माहिती दिली. सावित्री नदी परिसरातील मगर हा अत्यंत महत्त्वाचा वन्यजीव असून त्याला 'शेड्युल अ' अंतर्गत संरक्षित दर्जा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नदी व खाडी परिसंस्थेतील संतुलन राखण्यात मगरींची भूमिका महत्त्वाची असून त्या जैविक कचऱ्याचे विघटन करण्यासही हातभार लावतात, असे त्यांनी सांगितले.

महाड ते दासगाव, बिरवाडी, पोलादपूर, वलंग, नाते या परिसरात मगरींचा वावर आढळतो. मात्र अंडी चोरी, पिल्लांची व कातडीची तस्करी तसेच नदीतील वाढते प्रदूषण आणि प्लास्टिकमुळे त्यांच्या अस्तित्वावर धोका निर्माण होत असल्याची चिंताही व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थी दशेतच मुलांना निसर्ग पर्यावरण व जलचर यांच्या विषयी जिज्ञासा निर्माण झाल्याने भावी काळात राष्ट्राला निसर्ग, पर्यावरण व जीवसृष्टी रक्षणासाठी एक सक्षम पिढी निर्माण होण्याचा विश्वास या निमित्ताने व्यक्त होत आहे.

# मजगाव मराठी शाळेत विद्यार्थ्यांना सायकल वाटप



**मुरूड : प्रतिनिधा**

मजगाव येथील जिल्हा परिषद शाळेत ऐनजीओ इनर व्हील क्लब ऑफ बॉम्बे पियर यांच्या सौजन्याने ४१ विद्यार्थ्यांना सायकलींचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत ये–जा करण्यासाठी सोयीस्कर सुविधा उपलब्ध करून देणे हा होता त्याचप्रमाणे गरीब मुले, मुली यांना शिकण्याची प्रेरणा मिळावी यासाठी हा विशेष उपक्रम सस्थेमार्फत राबवला जातो.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऐनजीओ इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे पियर च्या उपासना साबू त्यांच्या समवेत मारिया लोखंडवाला, निशरीन शम्झ, मुनिरा काठावाला (कॅनरा रोबिको कंपनी) तसेच शिक्षक वर्ग बाळासाहेब फुंदे, चेतन चव्हाण, स्वप्नाली बाजी, मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य, पालक वर्ग, इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात मुख्याधपिका रेश्मा धुमाळ यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की, आमच्या शाळेतील होतकरू व गरीब मुलांना सायकल मिळाल्यामुळे त्यांना शिक्षणाची आवड निर्माण होऊन मुले अभ्यासातसुद्धा हुशार होण्यास मदत होणार आहे.

माजी विद्यार्थी संघाचे सदस्य निलेश मिटकर यांच्या प्रयत्नातून ह्या सायकली प्राप्त झाल्या आहेत. त्यांनी केलेले हे योगदान अत्यंत कौतुकास्पद असून यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात सातत्य राखण्यास मदत होईल, असे विचार यावेळी धुमाळ यांनी व्यक्त केले.

# हनुमान मंदिराचा आज जत्रोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगर येथील श्री हनुमान मंदिराचा जत्रोत्सव कार्यक्रम गुरुवार ९ एप्रिल २०२६ रोजी होणार असून त्यानिमित्त मंदिरात श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आले असून तरी भाविकांनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तीर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जत्रोत्सव कमिटीचे प्रमुख पोलीस पाटील सुभाष पारखे व सहकाऱ्यांनी केले आहे.



जुने माणगाव संगमेश्वर नगर येथील श्री हनुमान मंदिराचा हा जत्रोत्सवाचा कार्यक्रम ग्रामीण भागातील लोकांसाठी व यात्रेकरूंसाठी एक आकर्षण असते. खेडोपाड्यातून यात्रेकरू या यात्रेसाठी आवर्जून येत असतात. याठिकाणी वाकडाई देवी उतेखोल येथून पालखी तसेच काही गावांतून मानाच्या जत्तर काठया येत असतात.

दरवर्षी मोठ्या उत्साहात व शांततेत हि यात्रा संपन्न होते. यावर्षीही या जत्रोत्सवामध्ये यात्रेकरूंनी मोठया संख्येने सहभागी होऊन जत्रोत्सवाचा आनंद लुटावा, असे आवाहनही जत्रोत्सव कमिटी जुने माणगाव यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# नागोठण्यात जोगेश्वरी मातेचा भव्य पालखी सोहळा उत्साहात

**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराजांचा चैत्र पालखी सोहळा यंदा अभूतपूर्व उत्साहात पार पडला. शुक्रवारी (दि. ३) रोजी सकाळी १० वाजता प्रारंभ झालेला हा सोहळा तब्बल ८४ तासांनंतर सोमवार दि. ६ एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजता मंदिरात पालखी आगमनाने विधिवत समारोप झाला.

पालखी मंदिरात पोहोचल्यानंतर श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांचे मुखवटे देवळात स्थापित करून गोंधळ्याच्या साथीने पूजाअर्चा व आरती करण्यात आली. कोणत्याही अडथळ्याशिवाय, अत्यंत शांततामय व भक्तिमय वातावरणात हा सोहळा निर्विघ्न पार पडला.

श्री जोगेश्वरी देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन व सचिव भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, उपाध्यक्ष संतोष चितळकर, सचिव विवेक देशपांडे, खजिनदार जितेंद्र कजबजे, सहसचिव अनिल पवार, सहखजिनदार सतिश पाटील व सर्व सदस्यांनी केलेल्या शिस्तबद्ध नियोजनाचे ग्रामस्थांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

पालखी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी नागोठणे पोलीस ठाणे, ग्रामपंचायत, पत्रकार, वीज वितरण कंपनी, विविध संस्था, संघटना, सामाजिक मंडळे तसेच गावातील प्रत्येक आळीतील अध्यक्ष यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याबद्दल श्री जोगेश्वरी देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव भाईसाहेब टके व उत्सव समितीच्या वतीने सर्वांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर व पदाधिकाऱ्यांचा देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने सचिव दिलीपभाई टके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या भव्य सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाईसाहेब टके व उत्सव समितीतील सर्व पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने मेहनत घेतली.

# शाळांमध्ये संकलित चाचण्यांचे आयोजन

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेण्यासाठी एप्रिल महिन्यात संकलित चाचण्यांचे आयोजन करण्यात आले असून, त्यासोबतच शाळा भेट नियोजनाबाबतही महत्त्वाचे निर्देश देण्यात आले आहेत.

उपलब्ध परिपत्रकानुसार, इयत्ता दुसरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ११, १५ व २२ एप्रिल रोजी नियतकालिक मूल्यांकन चाचणी (PAT) अंतर्गत प्रथम भाषा, गणित तसेच तृतीय भाषा इंग्रजी या विषयांची संकलित चाचणी क्रमांक २ घेण्यात येणार आहे. तसेच इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठीही याच कालावधीत वार्षिक परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, जिल्हास्तरावरून शाळा भेटीचे नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले असून, नेमून दिलेल्या शाळांव्यतिरिक्त उर्वरित तालुक्यातील १०० टक्के शाळांच्या भेटीचे नियोजन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे नियोजन लवकर पूर्ण करून त्यावर गटशिक्षणाधिकारी व पंचायत समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

यासाठी स्वतंत्र गूगल फॉर्म लिंकही उपलब्ध करून देण्यात आली असून, त्याद्वारे शाळा भेटीची माहिती सादर करावी लागणार आहे. हा आदेश शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे व ललिता दहितुले यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे.

# राजस्थानचा मुंबईवर 'रॉयल' विजय

## यशस्वी, वैभवची जोरदार फटकेबाजी

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

पावसामुळे बराच वेळ वाया गेल्याने ११-११ षटकांच्या झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघ मुंबई इंडियन्ससमोर वरचढ ठरला. राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना १५० धावा केल्या होत्या. मुंबईला मात्र १२३ धावांपर्यंत मजल मारता आली. राजस्थानकडून यशस्वी जयस्वालने जबरदस्त खेळी केली, तर वैभव सूर्यवंशीनेही फटकेबाजी करत त्याला साथ दिली.

गुवाहाटीतील बरसापारा मैदानावर झालेला हा सामना पावसामुळे उशिरा सुरू झाला. बराच खेळ वाया गेल्याने ११ षटकांचा सामना खेळवण्यात आला. मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण त्यांचा हा निर्णय राजस्थानच्या सलामीवीरांनी चुकीचा ठरवला.



सलामीला आलेल्या राजस्थानच्या यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशीने मुंबईच्या अनुभवी गोलंदाजांचा समाचार घेतला. पहिल्या तीन षटकातच राजस्थानने ५८ धावा केल्या. वैभव आणि यशस्वीने मुंबईच्या गोलंदाजांची अक्षरशः पिसे काढली. वैभव आणि बुमराह पहिल्यांदाच आमने-सामने आले. पहिल्या तीन चेंडूचा सामना करताना वैभवने बुमराहला दोन षटकार लगावले.

वैभवने १४ चेंडूमध्येच ३९ धावा केल्या, तर यशस्वी ३२ चेंडूमध्ये ७७ धावांवर नाबाद राहिला. राजस्थानचा कर्णधार रियान परागनेही १० चेंडूत २० धावा केल्या.

१५१ धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात खराब झाली. पहिल्याच षटकात रयान रिकल्टन संघाची धावसंख्या १० असताना बाद झाला. त्यानंतर २० धावांवर मुंबईला दुसरा झटका बसला. सूर्यकुमार यादव दोन चेंडूमध्ये सहा धावांवर बाद झाला. त्यानंतर सलामीवीर रोहित शर्माही पाच धावांवर माघारी परतला. मुंबईचे फलंदाज सलग बाद होत गेले.

शेफर्ड रूदरफर्ड आणि नमन धीर या दोघांनीच डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण रुदरफर्ड आठ चेंडूमध्ये २५ धावा आणि नमन १३ चेंडूत २५ धावा करून बाद झाले. त्यानंतर मुंबईचा डाव गडगडला आणि संपूर्ण संघ १२३ धावांवर बाद झाला.

# ताडदेव जिमचा अजय कडू 'टागोर नगर श्री'चा मानकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

ताडदेव जिमच्या अजय कडू याने टागोर नगर मित्र मंडळ, व्यायामशाळा विभागाने आयोजित केलेल्या स्पर्धेत टागोर नगर श्री किताब पटकविला. पेतीत जिमचा विजय गोडसे 'बेस्ट पोझर' ठरला.

अॅम्युचर बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या मान्यतेने टागोर नगरने कबड्डी स्पर्धेनंतर या राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले होते. विक्रोळी (पूर्व) येथील साईबाबा मंदिराशेजारील मैदानात झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून नामवंत शरीरसौष्ठव स्पर्धाकानी भाग घेतला होता.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण स्थानिक नगरसेवक राजेश सोनावळे, मंडळाचे अध्यक्ष मनोज पवार, कार्याध्यक्ष गिरीश पवार, सचिव सुरेश परब, कोषाध्यक्ष महेंद्र भास्कर यांच्या उपस्थितीत पार पडला.

**गटनिहाय विजेते**

शॉर्ट ग्रुप (१६५ सेंमीखालील) : कौस्तुभ राणे (संजीवनी जिम), सुरेंद्र डांगवळ (अल्फा जिम), अविनाश राजपूत.

मेडियम ग्रुप (१६५ ते १७० सेंमी) : मुकुंद

## विजय गोडसे बेस्ट पोझर




मांजरेकर (संजीवनी जिम), निहाल भुवड (प्रेरणा जिम), अविनाश गोरीवले (प्रेरणा जिम).

टॉल ग्रुप (१७० ते १७५ सेंमी) : शार्दूल हरियान (हनुमान सेवा मंडळ), रेंडोल्फ डिसोझा (हनुमान सेवा मंडळ), अमित निकम (सम्राट व्ही.एस.).

सुपर टॉल ग्रुप (१७५ सेंमीपेक्षा अधिक) : अजय कडू (ताडदेव जिम), प्रशांत कांबळे (शेट्येज जिम), कार्तिक शेलटकर (हनुमाम सेवा मंडळ).

# यशस्वी जयस्वालचे षटकारांचे शतक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुंबईविरुद्ध इंडियन्सच्या सामन्यात राजस्थानचा युवा सलामीवीर यशस्वी जयस्वालने आपल्या स्फोटक फलंदाजीने गुवाहाटीच्या मैदानावर धुमाकूळ घातला. पावसामुळे उशिरा सुरू झालेल्या कमी षटकांच्या सामन्यात यशस्वीने अगदी पहिल्या चेंडूपासूनच मुंबईच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले.

यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी (१४ चेंडूत ३९ धावा) या दोघांनी मिळून अवघ्या पच षटकांत ८० धावांचा डोंगर उभा केला. दरम्यान, या सामन्यात यशस्वीच्या नावावर खास विक्रमाची नोंद झाली असून तो राजस्थानकडून खेळताना षटकारांचे शतक झळकावणारा चौथा खेळाडू ठरला आहे.

मुंबईविरुद्धच्या सामन्यात जैस्वालने अवघ्या ३२ चेंडूत नाबाद ७७ धावांची खेळी केली. या खेळीत १० चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. आपल्या खेळीतील चौथा षटकार ठोकून जैस्वालने राजस्थान रॉयल्सकडून खेळताना १०० षटकारांचा आकडा पूर्ण केला.

याआधी राजस्थानच्या संघासाठी १०० षटकार ठोकण्याचा पराक्रम केवळ संजू सॅमसन, जोस बटलर आणि शेन वॉटसन या तीन खेळाडूंनीच केला आहे.

# कपिल देवच्या गोलंदाजीवर चंदू बोर्डेंची शानदार फलंदाजी

**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटमधील दोन सुवर्णकाळांची एकाच खेळपट्टीवर भेट झाल्याचा व्हिडीओ सध्या पहायला मिळत आहे. १९८३चे विश्वविजेते कर्णधार कपिल देव आणि ९३ वर्षीय ज्येष्ठ क्रिकेटपटू चंदू बोर्डे यांचा एक अत्यंत हृदयस्पर्शी व्हिडिओ चाहत्यांचे लक्ष वेधत आहे.

ऐतिहासिक पुना क्लब लि.च्या क्रिकेट मैदानाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी हे दोन्ही दिग्गज उपस्थित होते. या क्लबने आपल्या क्रीडा प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून नव्याने विकसित केलेल्या जागतिक दर्जाच्या वाळू-आधारित क्रिकेट मैदानाचे भव्य उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला क्रिकेटचे दिग्गज



कपिल देव आणि भारताचे माजी खेळाडू चंदू बोर्डे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या नव्या मैदानावर कपिल देव व चंदू बोर्डे खेळण्यासाठी उतरले. ६७ वर्षी कपिल देव यांनी ९३ वर्षीय चंदू बोर्डे यांना गोलंदाजी केली. चंदू बोर्डे अगदी पारंपरिकरणे बॅटने मार्किंग करत फलंदाजीसाठी सज्ज झाले. वयाची नव्वदी ओलांडली असली तरी बॅटची पकड आणि क्रिकेटची ओढ आजही तशीच असल्याचे दिसले. चंदू बोर्डे यांनी खुद्द 'हरियाणा हुर्रिकन' कपिल देव यांच्या गोलंदाजीवर सुंदर फटके खेळले. दुसऱ्या चेंडूवरचा कव्हर ड्राईव्ह तर कमाल होता. या सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या चाहत्यांनीही या सुवर्णक्षणाचा आनंद घेत दोन्ही दिग्गजांचे कौतुक केले.

# हार्दिकने गोलंदाजांच्या डोक्यावर फोडले पराभवाचे खापर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सला राजस्थानविरूद्धच्या सामन्यात २७ धावांनी लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. मुंबईच्या पराभवानंतर कर्णधार हार्दिक पांड्या संतापला.

मुंबईच्या पॉवरप्लेमधील गोलंदाजीबद्दल बोलताना हार्दिक पांड्याच्या चेहऱ्यावरचा राग व निराश स्पष्ट दिसत होती. हार्दिक म्हणाला, मला वाटते आम्ही ज्या प्रकारे गोलंदाजी करायला हवी होती, ती नीट करू शकलो नाही आणि त्यांनी खूप चांगली फलंदाजी केली. आमच्या गोलंदाजांनी जबाबदारी घ्यायला हवी. गोलंदाजी विभाग म्हणून आम्ही अजिबात अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकलो नाही आणि त्यांनी उत्कृष्ट क्रिकेट खेळले.

# वैभव सूर्यवंशीची अनोख्या विक्रमाला गवसणी

**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्सचा १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी सध्या आयपीएलमध्ये एकापेक्षा एक उत्कृष्ट खेळी करत आहे. जगातील सर्वोत्तम गोलंदाज जसप्रीत बुमराहसमोर अनेक अनुभवी फलंदाज चाचपडतात, पण वैभव मात्र अजिबात डगमगला नाही. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या पहिल्या भेटीत शून्यावर बाद झाल्याची कसर वैभवने या सामन्यात चोख भरून काढली. वैभवने या सामन्यात १९ चेंडूत ३९ धावांची खेळी करत मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

वैभवने केवळ १४ चेंडूत ३९ धावांची तुफानी खेळी साकारली. विशेष म्हणजे, आपल्या आयपीएल कारकिर्दीत त्याने जसप्रीत बुमराहचा सामना करताना पहिल्या तीन



चेंडूंमध्येच दोन उत्तुंग षटकार खेचून सर्वांना अवाक् केले.

वैभव सूर्यवंशीने आयपीएलच्या इतिहासातील एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. वैभवने असा पराक्रम केला, जो गेल्या आठ वर्षांपासून ऋषभ पंत आणि इशान किशन यांच्या नावावर होता.

आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या किशोरवयीन खेळाडूंच्या यादीत वैभव आता अव्वल स्थानी पोहचला आहे. वैभवने सर्वाधिक ३५ षटकारांची नोंद आपल्या नावे केली आहे.

# कॅंडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेत प्रज्ञानंदला पराभवाचा धक्का



**पाफोस : वृत्तसंस्था**

भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदच्या कॅंडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा जिंकण्याच्या आशांना मोठा धक्का बसला असून आठव्या फेरीत त्याला अनिश गिरीकडून पराभव पत्करावा लागला आहे. त्याच वेळी महिलांमध्ये भारताच्या दिव्या देशमुखने युक्रेनच्या अॅना मुझिचुकवर विजयाची नोंद केली.

प्रज्ञानंदने या स्पर्धेची दिमाखात सुरुवात करताना गिरीवर मात केली होती, मात्र परतीच्या लढतीत गिरीने पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना या पराभवाची परतफेड केली. त्यामुळे प्रज्ञानंदचे आता आठ फेऱ्यांअंती केवळ ३.५ गुण राहिले असून अग्रस्थानावरील जावोखिर सिंदारोवपेक्षा (६.५) तो आता तीन गुणांनी मागे पडला आहे. या स्पर्धेच्या आता केवळ सहा फेऱ्या शिल्लक असल्याने प्रज्ञानंदला जेतेपद पटकावणे जवळपास अशक्यच झाले आहे.

महिलांमध्ये आर. वैशाली आणि कझाकस्तानची बिबिसारा असाऊबायेवा यांच्यातील लढत बरोबरीत संपली. कॅटरिना लायनोने अॅलेक्सांड्रा गोर्याचकिनाला पराभूत केले. चीनच्या दोन खेळाडूंमधील लढतीत झू जिनेरने टॅन झोंगयीचा पराभव केला. दिव्याने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना सुरुवातीच्या संघर्षानंतर मुझिचुकवर मात केली. आठ फेऱ्यांअंती महिलांमध्ये जिनेर, मुझिचुक, लायनो, दिव्या आणि वैशाली समान ४.५ गुणांसह संयुक्त अग्रस्थानी आहेत.

# आयपीएल सहभागामुळे 'ईसीबी'शी झालेल्या वादातून माझे क्रिकेट करिअर संपले -पीटरसन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगमधील सहभागावरून इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाबरोबर (ईसीबी) झालेल्या वादामुळे आंतरराष्ट्रीय कारकीर्द संपुष्टात आली, अशी खळबळजनक आरोप इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसने केला आहे.

यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाला दिलेल्या मुलाखतीत पीटरसनने आरोप केला की, आयपीएलच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये ईसीबीने प्रसारमाध्यमांचा वापर करून त्याच्या विरोधात एक पद्धतशीर 'मोहीम' चालवली होती. २००८मध्ये झालेल्या या स्पर्धेच्या पहिल्याच हंगामात ईसीबीने



केंद्रीय करारावर असलेल्या खेळाडूंना सहभागी होण्यास मनाई केली होती; त्या वर्षी सहभागी होणारा दिमित्री मस्कारेनहास हा एकमेव इंग्लिश खेळाडू होता.

२००९मध्ये इंग्लंडने खेळाडूंना केवळ तीन आठवड्यांच्या मर्यादित कालावधीसाठी स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी दिली. २००९मध्ये पीटरसन रॉयल चॅलेंजर्स बंगलोर' (आताचे बंगळुरू) संघात सहभागी झाला आणि या लीगला प्राधान्य देण्याच्या त्याच्या निर्णयामुळे ईसीबीसोबत त्याचे संबंध अत्यंत तणावपूर्ण बनले, असा आरोप केला जातो.

'मी मोठे त्याग केले. माझी कारकीर्द गमावली. म्हणूनच त्या प्रशासकीय व्यवस्थेतील प्रत्येकजण माझ्या विरोधात गेला. माझी इंग्लंडमधील क्रिकेट कारकीर्द संपली. त्यावेळी मी ३३ वर्षांचा होतो आणि १०४ कसोटी सामने खेळलो होतो. मी १५०-१६० कसोटी सामने खेळायला हवे होते, १२,०००-१३,००० धावा करायला हव्या होत्या. हेच मी साध्य करायला हवे होते,' असेही पीटरसनने नमूद केले.

'ईसीबीने माझ्यावर टीका करण्यासाठी आणि मला लक्ष्य करण्यासाठी 'द टेलिग्राफ' या वृत्तपत्राचा वापर केला. मला आता या विषयाच्या फार खोलात जायचे नाही. ही बाब त्यावेळी खूप गाजली होती, पण आता मी खूप आनंदी आणि शांततापूर्ण आयुष्य जगत आहे,' असेही पीटरसनने नमूद केले.

## माझ्या भूमिकेने खेळाडूंना स्वातंत्र्य!

'मी २००९ मध्ये घेतलेल्या भूमिकेमुळेच इंग्लंडच्या भविष्यातील खेळाडूंना फ्रँचायझी क्रिकेटमध्ये सहभागी होण्याचे स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली. काही दिवसांपूर्वीच मी जॉस बटलरची मुलाखत घेतली होती आणि त्यानेही मला धन्यवाद म्हटले. मी केलेल्या त्यागांमुळेच, आजच्या पिढीतील हे खेळाडू त्या स्वातंत्र्याचा आणि यशाचा आनंद घेऊ शकत आहेत,' असेही पीटरसनने यावेळी नमूद केले.

# 'धुरंधर २' पाहून विराट कोहली थक्क!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलदरम्यान विराट कोहली धुरंधर-२ चित्रपट पाहून थक्क झाला आहे. विराटने धुरंधर-२ चित्रपट पाहिल्यानंतर केलेली पोस्ट सध्या व्हायरल होत आहे. या त्याने माजी क्रिकेटपटू व दिग्दर्शक आदित्य धरचे विशेष कौतुक केलं आहे. विराटची पत्नी अभिनेत्री अनुष्का शर्मानेदेखील 'धुरंधर-२'चे कौतुक करणारी पोस्ट केली आहे.

भारतीय क्रिकेटचा सुपरस्टार विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा यांनी नुकताच आदित्य धर दिग्दर्शित धुरंधर २ : द रिव्हेंज हा चित्रपट पाहिला असून सोशल मीडियावर या पॉवर कपलची प्रतिक्रिया सध्या तुफान व्हायरल होत आहे. विराटने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर चित्रपटाचे कौतुक करणारी खास पोस्ट शेअर केली. विराटबरोबरच पत्नी अनुष्का शर्मानेदेखील हा चित्रपट पाहिल्यानंतर खास प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान, विराट कोहलीचा रिव्ह्यू सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. चाहते त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत, ज्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे.

# अर्जुन तेंडुलकरकडून नेट्समध्ये यॉकर्सचा मारा

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या लखनऊ सुपर जायंट्स संघाने गेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघावर दमदार विजयाची नोंद केली. लखनऊने आतापर्यंत दोन सामने खेळले आहेत, पण या दोन्ही सामन्यांमध्ये अर्जुन तेंडुलकरला खेळण्याची संधी मिळालेली नाही.

गेल्या हंगामापर्यंत अर्जून मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता, पण आयपीएल २०२६ स्पर्धेच्या लिलावाआधी लखनऊ सुपर जायंट्स संघाने त्याला ३० लाख रुपयात ट्रेड केले आहे. त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळालेली नसली तरीदेखील तो नेट्समध्ये स्वतःला सिद्ध करताना दिसून



येत आहे. नेट्समध्ये गोलंदाजी करताना त्याने टाकलेल्या यॉर्कर्सचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये ऋषभ पंत नेट्समध्ये फलंदाजीचा सराव करत आहे, तर अर्जुन तेंडुलकर त्याला एकापाठोपाठ एक अचूक यॉर्कर टाकताना दिसून येत आहे. त्याचे हे भन्नाट वेगाने येणारे यॉर्कर पाहून पंतदेखील शॉक झाला आहे. त्याची ही गोलंदाजी पाहता लवकरच अर्जून प्लेईंग ११मध्ये खेळताना दिसून येऊ शकतो.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com